# आपलं चिन्ह कमळ

## घड्याळाची वेळ आता चांगली नाही: शिवेंद्रराजे भोसले



**सातारा :** सातारा जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना राजकीय वातावरण दिवसेंदिवस तापत आहे. प्रत्येक पक्ष आपापल्या ताकदीने मैदानात उतरला आहे आणि मतदारांना आकर्षित करण्यासाठी जोरदार प्रचार सुरू आहे. अशातच रहिमतपूर नगरपालिकेतील सभेत राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसवर जोरदार टीकास्त्र सोडले. आपलं चिन्ह कमळ आहे. घड्याळाची वेळ आता चांगली नाही, अशा टिप्पणीमुळे सभेचे वातावरण आणखी रंगले. मतदारांनी भ्रमात न राहता भाजपवर विश्वास ठेवावा, असा ठाम संदेश त्यांनी दिला. शिवेंद्रराजे म्हणाले, की आता इकडे-तिकडे पाहू नका. हातातील घड्याळ आणि चिन्हावरील घड्याळ वेगळे आहे. कमळ चिन्हाचा आधार घ्या. विकास करणारे, स्थिर नेतृत्व देणारे उमेदवार निवडून द्या. त्यांच्या या वक्तव्यावर जनसमुदायातून मोठा प्रतिसाद मिळाला. गेल्या काही काळात राजकीय पक्षांतील बदल, फुट, चिन्ह वाद या सर्व चर्चांना चांगलाच उत आला असताना शिवेंद्रराजेंची ही टीका महत्त्वाची ठरली आहे. निवडणूक आयोगाने राज्यातील 246 नगरपालिका आणि 42 नगरपंचायतींच्या निवडणुका जाहीर केल्यानंतर सातारा जिल्ह्यातील राजकीय समीकरणात मोठे बदल होताना दिसत आहे.

# महाराष्ट्रात कडधान्य क्रांतीची सुरुवात

## केंद्राचे आत्मनिर्भरता अभियान राबवण्यासाठी फडणवीस सरकारची मंजुरी



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :** महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासादायक निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. केंद्र सरकारने जाहीर केलेल्या कडधान्य आत्मनिर्भरता अभियान राज्यात राबवण्यासाठी फडणवीस सरकारने अधिकृत मंजुरी दिली आहे. पुढील पाच वर्षे हे अभियान राबविले जाणार असून, महाराष्ट्राला कडधान्य उत्पादनात आत्मनिर्भर करण्याचा हा मोठा प्रयत्न आहे. शेतकऱ्यांना कडधान्याचे उत्पादन वाढवता यावे, आयातीवरील अवलंबित्व कमी व्हावे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळावी हा या उपक्रमामागचा उद्देश. या अभियानामुळे राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिला शेतकऱ्यांना थेट लाभ मिळणार आहे.

या योजनेअंतर्गत बियाणे उत्पादन आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या बियाणांच्या खरेदीसाठी 100 टक्के मदत केंद्र सरकार करणार आहे. तर इतर शेतीविषयक उपाययोजनांसाठी केंद्र 60 टक्के आणि राज्य 40 टक्के निधी देणार आहे. विशेष म्हणजे अभियानाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यासाठी राज्य शासनाने प्रशासनाला स्पष्ट सूचना दिल्या आहेत. या निधीचे वितरण आणि योजनेचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी कृषी विभागाकडे देण्यात आली आहे.

केंद्राने 2025-26 ते 2030-31 या कालावधीसाठी देशभर हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला असून, यासाठी एकूण 11,440 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील 34 जिल्ह्यांची निवड या योजनेसाठी झाली असून, तूर, हरभरा, उडीद, मूग आदी कडधान्यांच्या उत्पादन क्षेत्रात वाढ करण्याचा उद्देश आहे. शेतकऱ्यांना योग्य बियाणे, मार्गदर्शन, तंत्रज्ञान आणि बाजारपेठ यांचा लाभ मिळावा यासाठी विविध योजना यामधून राबवल्या जाणार आहेत.

केंद्र शासनाने राज्याला दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार महिला शेतकरी आणि समाजातील मागास घटकांना प्राधान्य दिले जाणार आहे. कडधान्य उत्पादनात हे घटक मोठ्या प्रमाणात सहभागी असतात, त्यामुळे त्यांना तांत्रिक प्रशिक्षणे, प्रोत्साहन आणि आर्थिक सहाय्य मिळाल्यास कुटुंबाची आर्थिक प्रगती अधिक वेगाने होईल, असा सरकारचा विश्वास आहे. तसेच, जिल्हानिहाय कृती आराखडा तयार करून अभियानाचे नियमित निरीक्षण केले जाईल.

कडधान्य आयात कमी करून देशाला आत्मनिर्भर करण्याचे केंद्र सरकारचे लक्ष्य आहे. तूर आणि हरभरा यांसारख्या कडधान्यांची मोठ्या प्रमाणावर आयात होत असल्याने दर चढ-उतार आणि टंचाईचा सामना करावा लागतो. त्यामुळे शेतकरी स्वतःच मोठ्या प्रमाणावर उत्पादन करू लागले, तर बाजारपेठही स्थिर राहील आणि शेतकऱ्यांना चांगला भाव मिळू शकेल. या अभियानामुळे महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रात मोठा बदल घडेल, उत्पादन वाढेल आणि शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती होईल.

# संसदेत वंदे मातरम म्हणण्यावर बंदी



उद्धव ठाकरेंचा दावा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :** केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने संसद भवनात वंदे मातरम म्हणण्यावर बंदी घातल्याचा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला. सरकारने संसदेत वंदे मातरम म्हणण्यास मनाई करणारी अधिसूचना जारी केली आहे. ही काय गोष्ट आहे? यामागे कुणाचे डोके आहे? माझे खासदार संसदेत जाऊन वंदे मातरम म्हणतील. भाजपमध्ये हिंमत असेल तर त्यांनी त्यांना बाहेर काढून दाखवावे, असे ते म्हणाले. भाजपचे हिंदुत्त्व ढोंगी आहे. त्यांच्या तोंडात राम व काखेत अदानी आहेत, असेही उद्धव ठाकरे यावेळी बोलताना म्हणाले.

उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात ते म्हणाले, राज्यात सध्या निवडणुकांचे वातावरण आहे. मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसह त्यांचे सर्वच सरकार प्रचारासाठी फिरत आहेत. गावोगावी किंवा जिथे कुठे निवडणूक आहे, तिथे जाऊन मते मागत आहेत. या निवडणुकीत केवळ पैशांचा धूर निघताना दिसत आहे. पैशांचे वाटप किंवा पैशाचा पाऊस किंवा अतिवृष्टी ही महाराष्ट्रात भयानक पद्धतीने सुरू आहे. एकप्रकारचा सत्तेचा माज व सत्तेचा दर्प या सर्व राजकर्त्यांच्या वक्तव्यातून व त्यांच्या वागणुकीतून महाराष्ट्र पाहत आहे. मी 8-10 दिवसांपूर्वी मराठवाड्यातील शेतकऱ्यांमध्ये जाऊन बसलो होतो. त्यांच्या वेदना, व्यथा समजून प्रयत्न केला. त्यांना धीर दिला. त्यानुसार एकही मंत्री शेतकऱ्यांमध्ये जाऊन बसत नाही.

## मराठीच्या सक्तीसाठी होणारा हिंसाचार चुकीचा

# अभिनेता सुनील शेट्टीचे स्पष्ट मत



**मुंबई :** मराठी भाषेवरून होणारे राजकारण व तिच्या सक्तीसाठी केली जाणारी मारहाण हे दोन्ही प्रकार अत्यंत चुकीचे आहेत, असे परखड मत मत बॉलिवूड अभिनेता सुनील शेट्टीने व्यक्त केले आहे. मुंबईत राहणाऱ्या प्रत्येकाला मराठी आलीच पाहिजे, असेही तो यावेळी म्हणाला. मुंबई व महाराष्ट्रात हिंदी विरुद्ध मराठी वादात काही परप्रांतीयांना मारहाण करण्याच्या घटना घडल्या होत्या. राज्य सरकारने प्राथमिक शिक्षणात हिंदीची सक्ती केल्यामुळे हे प्रकार घडले होते. सहसा सिनेसृष्टीतील अभिनेते मंडळी अशा वादांवर बोलत नाहीत. ते स्वतःला त्यापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करतात. पण सुनील शेट्टीने एका मराठी वृत्तवाहिनीशी संवाद साधताना या वादावर परखड मत व्यक्त करून राजकारण्यांना आरसा दाखवण्याचे काम केले. 'मराठी भाषेवरून होणारे राजकारण व तिच्या सक्तीसाठी होणारा हिंसाचार अत्यंत चुकीचा आहे. पण मुंबईत राहणाऱ्या प्रत्येकाला मराठी आलीच पाहिजे,' असे तो म्हणाला. त्याच्या या विधानाची राज्याच्या राजकारणासह सिनेसृष्टीत खमंग चर्चा रंगली आहे. सुनील शेट्टीने यावेळी आपण राजकीय व बॉलिवूडच्या पाट्यांपासून स्वतःला दूर ठेवल्याचेही स्पष्ट केले.

# मालमत्तेसाठी सासूची हत्या

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :** घाटकोपर (पश्चिम) परिसरातील एका घरात बुधवारी सायंकाळी वृद्ध महिलेचा मृतदेह सापडलाता.या प्रकरणी घाटकोपर पोलिसांनी मुमताज इरफान खान (५०) या महिलेला अटक केली. आरोपी महिला मृत वृद्ध महिलेची सून असून मालमत्ता मिळवण्यासाठी मुमताजने सासूची हत्या केल्याची कबुली पोलिसांना दिली.घाटकोपरमधील हिमालय सोसायटीत शहनाज काझी (६५) वास्तव्यास होत्या. शहनाझ यांची बहीण बुधवारी सायंकाळी त्यांना फोन करीत होती. परंतु त्यांनी फोन घेतला नाही. त्यामुळे त्यांच्या बहिणीने शेजारी राहणाऱ्या सायका अन्सारी यांना फोन केला.

सायका शहनाज यांच्या घरी गेल्या आणि दरवाजा ठोठावला. मात्र बराच वेळ शहनाजने प्रतिसाद दिला नाही. ही बाब त्यांनी त्यांच्या बहिणीला सांगितली. त्यानंतर परिसरातील एका महिलेकडे असलेली शहनाज यांच्या घराची दुसरी चावी घ्यावी आणि दरवाजा उघडून पाहावे असे त्यांच्या बहिणीने सायकाला सांगितले. त्यानुसार सायका यांनी घर उघडले असता, शहनाज घरात रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे निदर्शनास आले.

# शिवसेना-भाजप युती ही विचारधारेची युती

## रवींद्र चव्हाण यांच्या वक्तव्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्पष्टीकरण



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २८ :** राज्याच्या राजकारणात शिवसेना-भाजप युतीबाबत सुरू असलेल्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी ठोस भूमिका घेत स्पष्ट केले की, शिवसेना-भाजप युती ही सत्ता किंवा परिस्थितीजन्य नाही.स्व.बाळासाहेब ठाकरे, अटल बिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण अडवाणी यांनी विचारधारेवर ही युती घडवली आहे.त्यामुळे ही युती जुनी, मजबूत असून कायम राहील.

उपमुख्यमंत्री शिंदे नाशिक दौऱ्यावर असताना पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना त्यांनी ही भूमिका मांडली. कारण दोनच दिवसांपूर्वी सिंधुदुर्ग जिल्ह्यात भाजपच्या एका कार्यकर्त्याच्या घरात अचानक धाड घालत शिंदे यांच्या शिवसेनेचे स्थानिक नेते व आमदार निलेश राणे यांनी रोख २५ लाख रुपयांची रोकड प्रसार माध्यमांना दाखवत भाजप प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण हे सिंधुदुर्ग जिल्ह्यात आल्यानंतरच पैशाचे वाटप होते कसे...? असा थेट आरोप केला होता.

त्याच्या दुसऱ्या दिवशीच प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण यांची जळगाव जिल्ह्यात एक सभा झाली.ती आटपून आपल्या गाडीत बसत असताना प्रसार माध्यमांनी शिवसेनेचे नेते व आमदार निलेश राणे यांच्या आरोपावर प्रतिक्रिया विचारली असता आधीच चिडलेल्या आ.चव्हाण यांनी "अरे आमची २ तारखेपर्यंत तरी युती टिकायला हवी, यावर २ तारखेनंतर पक्षाची भूमिका स्पष्ट करू," अशी जाहीर प्रतिक्रिया दिल्याने राज्याच्या सत्तेत महायुती म्हणून सहभागी असलेल्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेशी युती राहणार की तुटणार अशा विविध चर्चांना प्रसार माध्यमांनी रान उठवून युती भोवती संभ्रमाचे वातावरण निर्माण केले.

त्यामुळेच आज नाशिक दौऱ्यावर असताना इगतपुरी येथील एक जाहीर सभा आटोपून शिवसेनेचे मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भाजप प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण यांनी केलेल्या सूचक वक्तव्यावर प्रतिक्रिया विचारली असता त्यांनी आपली भाजप सोबत ची युती विचारांवर आधारीत असल्याचे सांगत शिवसेनेची भूमिका स्पष्ट केली.कारण विशेषतः सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वादानंतर दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू असताना, उपमुख्यमंत्री शिंदे यांची भूमिका यासर्व पार्श्वभूमीवर महत्त्वाची मानली जात आहे.

# २ डिसेंबरला राज्यात सुट्टी

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २८ :** महाराष्ट्रात आगामी नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांचा धुरळा सुरू असताना मोठा निर्णय घेण्यात आला आहे. 2 डिसेंबर रोजी होणाऱ्या मतदानासाठी राज्यात सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली असून या दिवशी बँका, केंद्र व निमशासकीय कार्यालये बंद राहणार आहेत. निवडणुकीत मतदारांचा सहभाग वाढावा आणि नागरिकांनी निर्बाध मतदान करावे, यासाठी प्रशासनाने हा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले.

राज्यातील 246 नगरपरिषदा आणि 42 नगरपंचायतींमध्ये 2 डिसेंबर 2025 रोजी मतदान होणार असून त्यानंतर 3 डिसेंबरला मतमोजणी पूर्ण केली जाईल. पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सुट्टीची अधिकृत माहिती जाहीर केली. आळंदी, बारामती, भोर, चाकण, दौंड, फुरसुंगी-उरळी देवाची, इंदापूर, जेजूरी, जुन्नर, लोणावळा, माळेगाव बुद्रुक, मंचर, राजगुरुनगर, सासवड, शिरूर, तळेगाव दाभाडे आणि वडगाव मतदारसंघात ही सुट्टी लागू राहणार आहे. मतदारांनी घराबाहेर पडून आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे प्रशासनाचे आवाहन आहे. सुप्रीम कोटनि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 31 जानेवारीपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश दिल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने तारखा निश्चित केल्या. अर्ज भरण्यापासून निकाल जाहीर होईपर्यंतचा कार्यक्रमही निश्चित झाला असून 10 नोव्हेंबरला नामांकन भरती सुरू होईल आणि 21 नोव्हेंबरपर्यंत माघार घेता येईल. अधिकृत निकाल 10 डिसेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येतील. प्रशासन, राजकीय पक्ष आणि नागरिक सगळेच निवडणुकीच्या तयारीत मैदानात उतरत असताना, 2 डिसेंबरची सार्वजनिक सुट्टी मतदानाचा टक्का वाढविण्यास महत्त्वाची ठरणार आहे.

# संजय राऊत परत रणांगणात



**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची आक्रमक भूमिका पुन्हा एकदा मैदानात पाहायला मिळणार आहे. पक्षाचे प्रवक्ते आणि खासदार संजय राऊत सोमवारपासून पुन्हा सक्रिय राजकीय मोहीम उभारणार असून, सकाळी माध्यमांसमोर येऊन ते महत्त्वाचे मुद्दे मांडणार आहेत. आजारपणामुळे काही दिवस शांत राहिल्यानंतर राऊत पुन्हा मैदानात उतरत असल्याने विरोधकांसाठी ही धडकी भरवणारी बाब ठरणार आहे. सध्या राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, आचारसंहिता आणि राजकीय आरोप-प्रत्यारोपांचा तुफान सुरू आहे. अशा परिस्थितीत संजय राऊत यांच्या पुनरागमनाने शिवसेना ठाकरे गटाचा आवाज अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. सत्ताधारी पक्षाच्या नेतृत्वावर हल्ले, सत्ताधाऱ्यांवर टीका आणि शिंदे गटाला चोख प्रत्युत्तर देण्याची संजय राऊत यांची स्टाईल पुन्हा एकदा पहायला मिळेल, अशी पक्षातील सूत्रांची माहिती आहे. राऊत नेहमीप्रमाणे सरकारवरील टीकेत कोणतीही कुचराई करणार नाहीत, हे निश्चित. त्यामुळे सोमवारी सकाळपासूनच राजकीय चर्चांना पेट बसणार हेही तितकेच स्पष्ट आहे. त्यांच्या वक्तव्यांवर सत्ताधारी शिंदे-फडणवीस-शिंदे सरकार कशी प्रतिक्रिया देईल? याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. राज्यातील बदललेल्या राजकीय समीकरणांमध्ये राऊतांची भूमिका पुन्हा किती धारदार राहते, हे आगामी दिवसांत समोर येईल.

## कुर्ल्यात मध्यरात्री अग्नितांडव

# ३० झोपड्या, गोदाम जळून खाक

**मुंबई :** कुर्ला - सीएसएमटी मार्गावरील किस्मत नगरातील खलील शेख चाळीत गुरुवारी रात्री ११ च्या सुमारास अचानक आग लागली. या भीषण आगीत चाळीतील ३० झोपड्या, गोदाम जळून खाक झाली. त्या घटनेत मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली असली तरीही सुदैवाने कोणीही जखमी झाले नाही. चाळीत आग लागताच रहिवाशांनी तात्काळ सुरक्षितस्थळी पळ काढला. सुरुवातीला रहिवाशांनी आग विझविण्याचे प्रयत्न केले. त्यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य हाती घेतले. त्याचबरोबर पोलीस, संबंधित पालिका विभाग कार्यालयातील कर्मचारी व विजेचे वितरण करणाऱ्या कंपनीचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले.

# महावितरण ॲक्शन मोडवर

## ७ हजार थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित



■ **महासागर प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर, दि. २८ :** छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील 5 लाखांहून अधिक ग्राहकांकडे थकीत 300 कोटी रुपयांच्या वीजबिल वसुलीसाठी महावितरणने धडक मोहीम सुरू केली आहे. नोव्हेंबर महिन्यात जवळपास 7 हजार थकबाकीदारांचा पुरवठा खंडित करण्यात आला आहे.

ग्राहकांनी चालू बिलासह थकबाकी भरून सहकार्य करावे आणि वीजपुरवठा खंडित होण्याची कारवाई टाळावी, असे आवाहन महावितरणने केले आहे.

छत्रपती संभाजीनगर परिमंडलात घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर वर्गवारीतील एकूण 5 लाख 9 हजार 732 ग्राहकांकडे 296 कोटी 88 लाख रुपयांची वीजबिल थकबाकी आहे. यात घरगुती वर्गवारीतील 4 लाख 59 हजार 444 ग्राहकांकडे 239 कोटी 11 लाख, व्यावसायिक वर्गवारीतील 37 हजार 290 ग्राहकांकडे 32 कोटी 80 लाख, औद्योगिक वर्गवारीतील 7 हजार 49 ग्राहकांकडे 13 कोटी 24 लाख व इतर वर्गवारीतील 5 हजार 649 ग्राहकांकडे 11 कोटी 73 लाख रुपयांची थकबाकी आहे.

छत्रपती संभाजीनगर शहर मंडलातील 1 लाख 34 हजार 741 ग्राहकांकडे 69 कोटी 6 लाख, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मंडलातील 2 लाख 32 हजार 496 ग्राहकांकडे 84 कोटी 79 लाख व जालना मंडलातील 1 लाख 42 हजार 495 ग्राहकांकडे 143 कोटी 3 लाख रुपयांची थकबाकी आहे. वसुलीसाठी छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील शहर, ग्रामीण व जालना मंडलात महावितरणतर्फे धडक वसुली मोहीम सुरू करण्यात आलेली आहे.

मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व अधीक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते, उपविभागीय अभियंते, शाखा अभियंते, तांत्रिक कर्मचारी या मोहिमेत प्रत्यक्ष ग्राहकांकडे भेट देऊन थकबाकी वसुलीसाठी सरसावले आहेत. अनेक ग्राहक तातडीने बिल भरून सहकार्य करत आहेत. तर जे ग्राहक बिल भरण्यास प्रतिसाद देत नाहीत, त्यांचा वीजपुरवठा नाईलाजास्तव खंडित करण्याची कारवाई या मोहिमेत करण्यात येत आहे.

## बसची सहा वाहनांना धडक

■ **महासागर प्रतिनिधी पुणे, दि. २८ :** येरवड्यातील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज उड्डाणपुलावर भरधाव बसने एकापाठोपाठ सहा वाहनांना धडक दिल्याची घटना गुरुवारी रात्री घडली. याप्रकरणी येरवडा पोलिसांनी बसचालकाला ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

येरवड्यातील गोल्फ क्लब चौकातून लोहगाव विमानतळाकडे जाण्यासाठी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज उड्डाणपूल बांधण्यात आला आहे. गोल्फ क्लब चौकातील वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर हा पूल बांधण्यात आला. गुरुवारी रात्री साडेदहाच्या सुमारास उड्डाणपुलावर किरकोळ अपघात झाल्यानंतर मोटार चालक थांबले होते.

त्यावेळी भरधाव वेगाने आलेल्या खासगी बसने वाहनांना धडक दिली. अपघातात दोघे जण जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच येरवडा पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी बसचालकाला ताब्यात घेतले. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

अपघातानंतर उड्डाणपुलावरील वाहतूक गोल्फ क्लब चौकातून वळविण्यात आली. अपघातग्रस्त वाहने बाजूला काढण्यात आल्यानंतर वाहतूक सुरळीत झाली, अशी माहिती पोलिसांनी दिली. याप्रकरणी बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

## फक्त कवितेवर जगणारा कवी महाराष्ट्राचा हास्यसम्राट

# डॉ. मिर्झा रफी अहमद बेग

**प्रा.डॉ. नरेशचंद्र काठोळे**
संचालक
मिशन आयएएस, अमरावती कॅम्प

लोणावळा येथे प्रा. राजेश चव्हाण यांच्या जीवन संजीवनी शिबिरासाठी आलो असताना विदर्भ महाविद्यालयाच्या ग्रुपवर डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांच्या दुःखद निधनाची बातमी वाचली. खऱ्या अर्थाने व-हाडी भाषा संपूर्ण महाराष्ट्रात नेणारा हा कवी अवेळी आमच्यातून निघून गेला. त्यांनाही भावपूर्ण आदरांजली.

मूळचा यवतमाळ जिल्ह्यातील नेर परसोपंत तालुक्यातील धनज माणिकवाडा या लहानशा खेड्यात राहणारा डॉ. मिर्झा रफी अहमद बेग आज आपल्यात नाही. महाराष्ट्रातील लोकप्रिय कवींच्या पदवीला आणि झी टीव्हीच्या हास्य सम्राट पदवीला देखील पात्र झाला होता. महाराष्ट्र राज्यामध्ये प्रचंड मानधन घेणारे जे कवी आहेत त्या कवीमध्ये मिर्झा रफी अहमद बेग याची गणना होत होती. हा कवी फक्त कवितेवर जगत होता. अगदी आड वळणाच्या माणिकवाडा नावाच्या गावात राहणारा व आता अलिकडे अमरावतीला स्थायिक झालेला हा कवी सोशल मीडियावर अतिशय लोकप्रिय झाला असून कोट्यावधी रसिकांच्या हृदयात त्याने स्थान मिळविले होते.

हा कवी कुणी प्राध्यापक नव्हता. अध्यापक नव्हता. व्यावसायिक नव्हता. पण आज कवितेच्या बळावर अमरावतीच्या वलगाव रोडवर त्याचा दोन मजली टूमदार बंगला आहे. याशिवाय खालच्या मजल्यावर मुलाचे स्टील सेंटर आणि हार्डवेअरचे प्रशस्त मोठे दुकान आहे. नुकताच मिर्झा रफी अहमद बेग हजची यात्रा करून परतला होता. हजचा खर्च हा प्रचंड लाखात असतो. तो त्याची पत्नी आणि आपल्या मुलांसह नुकताच हजला जाऊन आलेला होता.

मिर्झा रफी अहमद बेग यांचे मराठी भाषेवर प्रभुत्व होते. मराठी आणि व-हाडी भाषेचा सुरेख संगम त्यांच्या कवितेमध्ये झालेला आहे. विशेष म्हणजे त्याचे सादरीकरण हे अनन्यसाधारण होते. मिर्झा बोलायला लागला की ऐकतच राहावेसे वाटत होते. तो कवितेबरोबर किस्से पण सांगत होता .पण त्याची ही सांगण्याची शैली इतकी जबरदस्त होती की लोक तो मागील तेवढे प्रचंड मानधन द्यायला एका पायावर तयार होत होते.

मिर्झाची माझी भेट झाली तेव्हा तो धनज माणिकवाड्याला होता. त्याच्याजवळ फोनही नव्हता. माझ्या फोनवर त्याचे सर्व फोन यायचे .त्याचे सगळे कार्यक्रमाचे बुकिंग मी करायचो.त्याचा पहिला कवितासंग्रह देखील सध्याचे खासदार व तेव्हाचे व आताचे मिर्झाचे चाहते माजी कृषीमंत्री डॉ.अनिल बोंडे यांच्या पुढाकाराने मिर्झा एक्सप्रेस या नावाने मीच प्रकाशित केला होता.

मिर्झाच्या नावावर आज दोन डझन पुस्तके आहेत. एवढे पुस्तके एखाद्या प्राध्यापकाच्या नावावर नाहीत. तो कविता लिहीत नव्हता. कविता जगत होता. ज्या घटना त्याच्या सभोवताली घडतात त्या घटनांना तो काव्यमय आकार देत होता आणि तो स्टेजवरून त्या अतिशय समर्थपणे सादर करीत होता.

एक काळ असा होता की मिर्झा विठ्ठल वाघ, शंकर बडे, नारायण कुलकर्णी कवठेकर ही मंडळी एकत्र कार्यक्रम करायची. त्याला नाव होते वऱ्हाडी कवी संमेलन. नारायण कुलकर्णी कवठेकर यांचे संचलन असायचे. अमरावतीचे आझाद हिंद मंडळ श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय नगर वाचनालय बडनेरा येथील आरडीआयके कॉलेज असे कितीतरी कार्यक्रम या संयुक्त वऱ्हाडी कवींनी केले होते.

पुढे मिर्झाने मिर्झा एक्सप्रेस हा स्वतंत्र एकपात्री कार्यक्रम सुरू केला होता. त्याला चांगला प्रतिसाद मिळू लागला होता. तीन-चार जणा मिळून कार्यक्रम केला तर मानधन कमी मिळायचे. परत सर्वांच्या तारखा जुळून यायला वेळ लागायचा. पण मिर्झाने स्वतंत्र कार्यक्रम सुरू केल्यानंतर त्याला चांगला प्रतिसाद मिळू लागला होता. त्यातच नागपूरच्या दैनिक लोकमतने मिझार्जी कहीन हा प्रश्नोत्तराचा कार्यक्रम मिर्झाच्या मार्गदर्शनाखाली सुरू केला होता. त्याला त्या काळात प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. हजारोच्या संख्येने मिर्झाला पत्र यायची. आणि तो त्याच्या वराडी पद्धतीने विनोदी पद्धतीने निश्चितपणे दैनिक लोकमत मधून त्या प्रश्नांची उत्तरे द्यायचा. मिर्झाजी कहीन हे सदर खूपच गाजले होते.

मिर्झा खरा लोकांच्या समोर आला होता तो झी टीव्हीच्या हास्य सम्राट या कार्यक्रमामुळे. त्याच्या कवितेचा आशय त्याच्या कवितेची मांडणी त्याची शैली आणि त्याचे साधेपण झी टीव्हीच्या माध्यमातून हास्य सम्राट रूपाने जेव्हा महाराष्ट्रातील लोकांनी पाहिले तेव्हा लोकांनी अक्षरशः मिर्झाला डोक्यावर घेतले होते. पश्चिम महाराष्ट्र मराठवाडा उत्तर महाराष्ट्र यांनी तर मिझार्ला प्रचंड मोठी साथ दिली होती.प्रचंड मानधन दिले होते. मिझार्ची तारीख मिळत नव्हती अशी परिस्थिती झाली होती. एक काळ असा होता की मिर्झा धनज माणिकवाडा या गावावरून बसने नेरपरसोपंतला यायचा. तेथून बस बदलून अमरावतीला यायचा. राजापेठला उतरायचा. आणि माझ्या भारतीय महाविद्यालयामध्ये यायचा. मग आमची भ्रमंती सुरू व्हायची.

मिर्झा नुसतं कविता लिहूनच थांबला नाही. तर तो चळवळीत देखील काम करीत होता. आम्ही स्थापन केलेल्या बहुजन साहित्य परिषदेच्या कार्यकारणीमध्ये तो होता. पहिले बहुजन साहित्य संमेलन त्याने यवतमाळ जिल्ह्यातील नेर परसोपंत येथे घडवून आणले. पुढे आम्ही त्याला यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा येथे झालेल्या बहुजन साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद बहाल केले होते. सुरुवातीच्या काळात मिर्झाच्या कार्यक्रमाला तिकीट लागायचे. तिकीट लावून कार्यक्रम करणारे जे काही निवडक लोक महाराष्ट्रामध्ये आहेत.

# कर्करोग रूग्णांसाठी डे-केअर सेंटर सुरू करणार : प्रकाश आबिटकर



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २८ :** सार्वजनिक आरोग्य विभाग आणि टाटा रुग्णालयाच्या माध्यमातून कर्करोग मुक्त महाराष्ट्र हा उपक्रम हाती घेण्यात येणार आहे. त्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या माध्यमातून व टाटा कर्करोग रुग्णालयाच्या तांत्रिक सहकार्याने राज्यात २६ ठिकाणी डे - केअर सेंटर सुरू करण्यात येणार आहेत. यामुळे ग्रामीण भागातील जिल्हास्तरावर कर्करोग रुग्णांना सेवा उपलब्ध होणार आहे.

सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांनी नुकतेच परेल येथील टाटा मेमोरियल रुग्णालयाला भेट दिली. त्या भेटीत डे केअर तांत्रिक सहकार्य व प्रशिक्षण याबाबत चर्चा झाली. यावेळी टाटा मेमोरियल केंद्राचे संचालक डॉ. सुदीप गुप्ता, टाटा मेमोरियल रुग्णालयाचे मुंबईचे संचालक डॉ. सी. एस. प्रमेश, उपसंचालक डॉ शैलेश श्रीखंडे, उपसंचालक सिद्धनाथ लष्कर, रुग्णालय अधीक्षक डॉ. विनीत सामंत उपस्थित होते. अलिकडच्या काळात कर्करोग रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाचेवतीनेही राज्यभर कर्करोग तपासणी व उपचार मोहीम राबवली जात आहे. टाटा मेमोरियल रुग्णालयाच्या माध्यमातून कर्करोग निर्मूलनाचे काम उत्तमपणे सुरू आहे. या दोन्ही संस्थानी एकमेकांच्या सहकार्याने कर्करोग मुक्त महाराष्ट्र करण्याचा राज्य सरकारचा निर्धार असल्याचे आबिटकर यांनी सांगितले.

त्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या माध्यमातून व टाटा कर्करोग रुग्णालयाच्या तांत्रिक सहकार्याने राज्यात २६ ठिकाणी डे - केअर सेंटर सुरू करण्यात येणार आहेत. यामुळे ग्रामीण भागातील जिल्हास्तरावरील कर्करोग रुग्णांना आरोग्य सेवा उपलब्ध होतील, असेही त्यांनी सांगितले. राज्य शासनाने महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत उपचारांच्या पॅकेजच्या दरामध्ये वाढ केली आहे. अनेक नवीन आजारांचा समावेश केला आहे. त्यामुळे अधिकाधिक रुग्णांना मोफत उपचार मिळणार आहेत. त्याचा कर्करोग रुग्णांनाही फायदा होईल. कर्करोगावर मात करण्यासाठी आरोग्य विभागाच्यावतीने विशेष मोहिमेअंतर्गत फिरत्या दवाखान्याच्या माध्यमातून राज्यभर महिलांची कर्करोग तपासणी मोहीम सुरू आहे.

कर्करोगाचे लवकर निदान होणे गरजेचे असल्याने तपासणी मोहीम प्रभावीपणे राबवली जाईल. कर्करोग रुग्णांना उपचारांच्या पश्चातही आवश्यक सेवा देण्यात येईल. कर्करोगावर उपचार करणारे डॉक्टरही आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे देण्यासाठी आरोग्य विभागाच्या अभ्यास गटाला सूचना करतील. महाराष्ट्रातील खासगी रुग्णालयानी महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत कर्करोग रुग्णांना उपचार पश्चात सेवा द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.



# जिल्हा युवक महोत्सवाचा शुभारंभ कलागुणांना वाव देण्यासाठी महोत्सव महत्वपूर्ण : जिल्हाधिकारी





■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :
सर्वांगीण विकासासाठी क्रमिक शिक्षणासोबतच कला, क्रीडा, नृत्य यासारखे विविध कलागुण परिपूर्ण व्यक्तिमत्व विकसित करतात. नवनव्या प्रतिभा या महोत्सवातून पुढे येतात. युवकांतील कलागुणांना वाव देण्यासाठी युवक महोत्सव हा महत्वपूर्ण उपक्रम आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे केले.क्रीडा व युवक सेवा संचालनालय जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषदेच्या वतीने वसंत देसाई क्रीडांगण येथे आयोजित जिल्हास्तर युवा महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट,श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे आदी उपस्थित होते.महोत्सवात काव्यलेखन,कथालेखन, वक्तृत्व असे अनेक उपक्रम घेतले जातात. त्यातून विद्यार्थी व युवकांना प्रोत्साहन मिळते. कलागुणांचा विकास होतो व नवी प्रेरणा मिळते, असे जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी यावेळी सांगितले. दोन दिवस चालणाऱ्या युवा महोत्सवामध्ये काव्यलेखन,कथालेखन,वक्तृत्व,नवोपक्रम यासह विविध स्पर्धा होणार आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ.सतीशचंद्र भट्ट यांनी केले. विज्ञान प्रदर्शनातून नवोपक्रमाना चालना यावेळी उद्घाटन केले.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा अकोला जिल्हा दौरा



■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :
राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शनिवार दि. २९ नोव्हेंबर रोजी अकोला येथे येत आहेत. त्यांचा दौरा खालीलप्रमाणे :शनिवार, दि. २९ नोव्हेंबर रोजी दुपारी २.३० वाजता हेलिकॉप्टरने हिवरखेड हेलिपॅड, जि. अकोलाकडे प्रयाण. दुपारी २.५० वाजता श्री. केवल देशमुख यांच्या मालकीचे शेतातील हेलिपॅड, हिवरखेड, ता. तेल्हारा जि. अकोला येथे आगमन व मोटारीने कार्यक्रमस्थळाकडे प्रयाण. दुपारी ३ वाजता जाहिर सभा. दुपारी ३.०५ वाजता मोटारीने हिवरखेड हेलिपॅड जि. अकोलाकडे प्रयाण व हेलिकॉप्टरने अमरावतीकडे रवाना.

## अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभेच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :
क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभा, पुणे जिल्हा शाखा अकोला च्या वतीने अशोक वाटिका येथे विनम्र अभिवादन कार्यक्रम पार पडला.

फुले दाम्पत्यांच्या सामाजिक क्रांतीकारी कार्याची आठवण करून देत पुरोगामी विचारांचा जागर घडवणाऱ्या कार्यक्रमात ज्येष्ठ सत्यशोधक महादेवराव भुईभार, शिक्षण संस्था संचालक मंडळाचे विभागीय सचिव विजय कौसल, अ.भा. समाजवादी शिक्षण हक्क सभा अकोला जिल्हाध्यक्ष प्रा. विवेक हिवरे, ज्येष्ठ सर्वोदयी श्रीकृष्ण विखे, सर्वोदय मंडळाचे जिल्हाध्यक्ष बबनराव कानकिरड, प्रा. दतात्रय भाकरे, श्रीकृष्ण माळी, प्रमोद मुरुमकार, राजेश वानखडे यांच्यासह पुरोगामी चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महात्मा फुले यांच्या सामाजिक न्याय, स्त्री-शिक्षण आणि समता विचारांचा पुनःस्मरण करीत उपस्थित मान्यवरांनी आजच्या काळातील क्रांतीसूर्य महात्मा फुले व सत्यशोधक मंडळाचे महत्व अधोरेखित केले. समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन व शिक्षणाच्या हक्काबाबत लोकजागृती करण्याचा संकल्प करण्यात आला. महाराष्ट्र नशा बंदी मंडळाचे वतीने व्यसन मुक्ती ची शपथ देण्यात आली. सत्यशोधक प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

## थोडक्यात

### शहरातील निवडणुकीमुळे बेरोजगारांना रोजगार !

**बाळापूर** : नगरपालिका निवडणुकीचा अर्ज भरण्याचा कार्यक्रम संपला असला तरी, राजकीय पक्षांच्या प्रचाराच्या धामधुमीची खरी सुरुवात होण्याची प्रतीक्षा शहरातील बेरोजगार आणि रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांना लागून राहिली होती. कारण चिन्ह वाटपाचा कार्यक्रम २६ नोव्हेंबरला ठरल्यामुळे सर्वांनीच प्रचारासाठी वाट पहावी लागली. आता चिन्ह वाटप झाल्यामुळे प्रचाराचा धुराळा उडत असून, बेरोजगार युवकांनाही रोजगार उपलब्ध होत आहे. राजकीय पक्षांना उमेदवारांच्या सभा आणि रॅलीसाठी 'पगारी गर्दी' जमवण्याची गरज पडते आणि हीच गरज अनेक कुटुंबांसाठी तात्पुरत्या उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देत आहे. सध्या रोजगार नाही. निवडणुकीत दोन- चारशे रुपये रोज आणि जेवण मिळते. या कालावधीत दहाते बारा दिवस रोजगार मिळतो. सभांसाठी वाहने असतात, त्यात बसून जेथे सभा तेथे जायचे असा बेरोजगारांचा दिवसभराचा कार्यक्रम असतो. विशेषतः स्टार प्रचारकांच्या सभा यशस्वी करण्यासाठी, 'गरजवंत' घटकांकडून गर्दीची जमवाजमव केली जाते.

### नि:शुल्क भव्य आरोग्य शिबिर १२०० नागरिकांनी केली आरोग्य तपासणी

**अकोला** : अकोट फाईल येथील भारत नगर गरीब नवाज मस्जिद परिसरात आयोजित नि:शुल्क भव्य आरोग्य शिबिर उत्साहात व यशस्वीरीत्या संपन्न झाले. मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून फ्री औषध वितरण, फ्री शुगर तपासणी तसेच विविध आरोग्य सेवा यांचा लाभ घेतला. शिबिराचे उद्घाटन गरीब नवाज मस्जिदचे इमाम हाफिज आसिफ रजा साहेब व हाफिज वसीम रजा साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. अकोला शहरातील अनेक प्रसिद्ध डॉक्टरांनी या शिबिरात सेवा दिली मेडिसिन तज्ज्ञ डॉ. स्वप्निल लाहोळे नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. सराह सिद्दीकी, कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. जैद शेख, बालरोग तज्ज्ञ डॉ. रुकसार शेख, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. जेवरिया माहिन, दंत तज्ज्ञ डॉ. खान मुदब्बीर, दृष्टि तज्ज्ञ डॉ. मेहफूज शेख, सांधेदुखी व कंबरदुखी तज्ज्ञ डॉ. शेख मोईन रंगरेज, मूळव्याधतज्ज्ञडॉ. भारती मुठाळ, सर्जन डॉ. तमन्ना शर्मा, चिकित्सक डॉ. मोहम्मद फैजान, डॉ. रिजवान अंसारी, रेडियोलॉजिस्ट डॉ. इसरार सर्व डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी करून आवश्यक उपचार व मार्गदर्शन नि:शुल्क शिबिरात दिले.

# सिग्नलवर झेब्रा क्रॉसींग व स्टॉप लाईनचे उल्लंघन करणारे १०४ वाहनावर कार्यवाही

■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :
मा. पोलीस अधीक्षक साहेब अकोला यांचे आदेशानुसार शहर वाहतुक नियंत्रण शाखा, अकोला मार्फत विशेष मोहीम दरम्यान शहरात नो पार्कींग व रस्त्यावर उभे असलेले वाहनांवर तसेच सिग्नल पॉईट वर झेब्रा क्रॉसींग व स्टॉप लाईनचे समोर उभे असलेले वाहनावर मोवाका प्रमाने कार्यवाही करण्याकरीता अकोला शहरात दिनांक २७/११/२०२५ रोजी विशेष मोहीम राबवुन कारवाई करण्यात आली. सदर विशेष मोहीम दरम्यान शहर वाहतुक नियंत्रण शाखे मधील अधिकारी व अंमलदार यांचे मार्फतीने शहरात नो पार्कींग / रस्त्यावर वाहन उभे ठेवणारे तसेच स्टॉप लाईनचे उल्लंघन करणा-या वाहनावर १०४ वाहनांवर मोटार वाहन कायदयान्वये कार्यवाही करून ५६,०००/- रूपये दंड आकारण्यात आले असुन त्यापैकी ६,५०० /- रूपये



दंड वसुल करण्यात आले आहे.

शहर वाहतुक शाखे मार्फत नो पार्कींग / रस्त्यावर उभे असलेले चारचाकी वाहनांना जॅमर लावुन तसेच सिग्नलवर स्टॉप लाईन व झेब्रा कार्सींगचे उल्लघंन करणा-या वाहनावर मोवाका प्रमाणे कार्यवाही करणेस सुरूवात करण्यात आली आहे. तसेच मा. पोलीस अधीक्षक कार्यालय येथील सी. सी.टी.व्ही कक्ष (कमांड कंट्रोल रूम) येथुन शहरातील ४५ चौकांवर सी.सी.टी.व्ही कॅमेराव्दारे निगरानी ठेवल्या जात असुन त्यामध्ये वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालक यांचेवर निगरानी ठेवुन त्यांचेवर ऑनलाईन पध्दतीने चलान करण्यास सुरूवात करण्यात आली आहे.

तरी शहर वाहतुक नियंत्रण शाखे मार्फत अकोला शहरातील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे की, रोडवर तसेच नो पार्कीगमध्ये वाहन पार्क करू नये व सिग्नल असलेल्या चौकात सिग्नल रेड असल्यास स्टॉप लाईन व झेब्रा कांसींग चे उल्लंघन होणार नाही तसेच डाव्या बाजुचा रस्ता (लेफ्ट कॉर्नर) वाहतुकीसाठी चालु / मोकळा ठेवावा व वाहतुक नियमांचे उल्लंघन करू नये, वाहन चालवितांना सोबत वाहनांचे कागदपत्रे बाळगावे वाहतुक नियमांचे तंतोतंत पालन करावे व आपले वाहनावर पेंडीग दंड असल्यास त्वरीत वाहतुक पोलीस किंवा शहर वाहतुक कार्यालय येथे दंड भरावे .

## तेल्हारा नगर परिषद निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज

■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :
येथील नगर परिषदेची सार्वत्रिक पंचवार्षिक निवडणूक येत्या मंगळवारी २ डिसेंबर २० २५ असल्याने निवडणूक विभागाने जोरदार तयारी केली आहे. नगरातील विविध शाळा, धर्मशाळा, सामाजिक सभागृहे, या ठिकाणी मतदान केंद्रे उभारण्यात येणार आहेत. मतदान शांततेत व निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी विविध मतदान केंद्रावर प्रशिक्षित मनुष्यबळ तसेच पोलीस यंत्रणा



नियोजित करण्यात आली आहे. तेलारा नगर परिषदेत निवडणुकीत एकंदर १८२४७ मतदार असून त्यात पुरुष मतदार ८९८७ तर महिला मतदार ९२६० आहेत.

तेल्हारा नगरपरिषद मध्ये दहा प्रभाग असून नगरसेवक २० व नगराध्यक्ष एक पद, महिलांसाठी दहा जागा अनुसूचित जातीसाठी चार, अनुसूचित जमातीसाठी एक जागा, तर नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी पाच जागा आहेत. थेट जनतेतून निवडल्या जाणाऱ्या नगराध्यक्ष पदासाठी पाच उमेदवार रिंगणात आहेत. सेवक पदाकरता ९२ उमेदवार रिंगणात आहेत.

# अल्पवयीन बालीकेचा शोध घेण्यात सिटी कोतवाली पोलीसांना यश

■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :
पोलीस स्टेशन सिटी कोतवाली येथे दिनांक ०२/०८/२०२५ रोजी फिर्यादी ग.भा. जया शंकर दिपके यांनी तक्रार दिली की त्यांची देवांशी शंकर दिपके वय ८ वर्ष ९ महीने ही दिनांक ०२/०८/२०२५ रोजी शाळेत गेली त्यानंतर परत आली नाही अशा



तक्रारी वरून पोलीस स्टेशन सिटी कोतवाली येथे अप.क्र. २४३/२५ कलम १३७ बी. एन. एस. अन्वये नोंद करून तपास सुरू केला.

सदर गुन्हयाची गंभीरता लक्षात घेवुन पोलीस स्टेशन सिटी कोतवाली चे पोलीस निरीक्षक श्री संजय गवई यांनी तपास पथक गठीत करून त्यांना सुचना दिल्या. तपास पथक इटारसी, खंडवा या ठीकाणी पाठविण्यात आले परंतु बालीकेचा शोध लागला नाही तसेच शोधपत्रिका तयार करून रेल्वे स्टेशन व बस स्टॅंड मध्ये लावण्यात आल्या. व इतर जिल्हयामध्ये सुध्दा प्रसारीत करण्यात आल्या तरी सुध्दा बालिकेचा शोध लागला नाही.अखेर गुन्हयाचे तपासामध्ये कोणताही सुगावा नसतांना पोलीस स्टेशन सिटी कोतवाली चे तपास पथक यांनी गुन्हयातील बालीकेचा शोध घेणेकामी माहीती घेणे सुरू केले त्यावेळी अकोला चाईल्ड लाईन मार्फत बालिका ही नागपुर येथील बालगृहाम ध्ये असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली त्यामुळे सिटी कोतवाली पोलीसांनी विलंब न लावता बालीकेला ताब्यात घेतले.बालिकेचा शोध घेणे करीता मा. पोलीस अधीक्षक श्री अर्चित चांडक, मा. अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेडडी, मा. उपविभागीय पोलीस अधीकारी शहर विभाग श्री सुदर्शन पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सिटी कोतवाली पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक संजय गवई व तपास पथक ए. एस. आय. महेंद्र बहादुरकर, पो. हवा. अश्विन शिरसाट, किशोर येऊल, शेख ख्वाजा, अजय भटकर यांनी घेतला.

# अकोला पोलिसांनी केली अवैध गावठी दारू जप्त

■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :
पोलीस दलामार्फत जिल्ह्यातील अवैध गावठी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यां विरुद्ध 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत विशेष मोहीम राबविण्यात आली. मा. पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २८.११.२०२५ चे सकाळी १२.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत ही मोहीम प्रभावीपणे पार पडली. या विशेष मोहिमेत जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांतील पोलीस पथकांनी एकूण ८७ ठिकाणी कारवाई केली आहे.

कारवाईदरम्यान सुमारे ९,६४,०९०/- रुपये किमतीचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला, तर अवैध धंद्यात सामील असलेल्यांवर आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. अशा प्रकारे अकोला जिल्हा पोलिसांनी एकूण ८७ केसेस करून ९,६४,०९०/- रुपयांच्या अवैध दारू साहित्यावर कारवाई केली आहे.अवैध गावठी दारू उत्पादनाम



ुळे जनतेच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होवुन व शांतता भंग होते. या पार्श्वभूमीवर अकोला पोलिस दलाने अशा अवैध धंद्यावर कठोर कारवाई करताना जनतेचा विश्वास कायम ठेवला आहे. पुढील काळात अशा प्रकारच्या अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी या पुढे सुद्धा नेहमी कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिस प्रशासनाने कळिवले आहे.अवैध दारू विरोधातील ही मोहीम सुरूच राहणार असून, नागरिकांनी अशा प्रकारच्या बेकायदेशीर अवैध दारू विक्री व निर्माण करणाऱ्यां विषयी माहिती असल्यास जवळच्या पोलीस ठाण्यात कळवावे.

तसेच निवडणुक प्रक्रीया भयमुक्त व शांतातमय पार पाडण्यासाठी अकोला पोलीस दल सज्ज आहे.

# चालक/वाहकांना गादी,बेड किंवा आरामदायक सोयी उपलब्ध करुन देण्याच्या आदेशाला केराची टोपली

■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :
सध्या थंडीचा जोर वाढत आहे. आणि यामुळे अनेक चालक वाहकांना समस्यांचा सामना करावा लागतो आहे. विशेषतः अकोला आगारातील एसटी चालक-वाहकांसाठी परिस्थिती अधिकच कठीण झाली आहे. अनेक लांब पल्ल्याच्या एसटी गाड्या रात्री मुक्कामासाठी अकोला आगारात थांबतात. या ठिकाणी असलेल्या विश्रांती कक्षामध्ये चालक वाहकांना गादी, बेड किंवा आरामदायक सोयी उपलब्ध होत नाहीत. त्यांना फक्त स्वतः सोबत आणलेली साथी चटई आणि चादरीवरच रात्र काढावी लागते. वाहन चालकांना थंडीचा बचाव करण्यासाठी स्वतःच घरून ब्लकेट आणावे लागते. विश्रांती कक्षाची स्वच्छतादेखील अत्यंत कमी आहे. त्यामुळे चालक-वाहकांना



स्वतःच तेथे सफाई करून रात्र काढावी लागते.

या प्रकारच्या अत्यल्प सुविधा आणि स्वच्छतेच्या अभावामुळे त्यांना खूप अडचणींचा सामना करावा लागतो. म्हणून चालक-वाहकांना गादी, बेड किंवा आरामदायक सोयी उपलब्ध करुन देण्यात याव्यात. अशी मागणी (तक्रार) सामाजिक कार्यकर्ते उमेश इंगळे यांनी उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक रा.प. म.मध्यवर्ती कार्यालय रा.प. मुंबई यांच्या कडे आपल्या सरकार पोर्टल द्वारा केली होती. त्यांच्या तक्रारीची दखल घेत विभाग नियंत्रक राज्य परिवहन अकोला यांनी विभागीय भांडार अधिकारी/विभागीय अभियंता (स्था) अकोला रा. प अकोला यांना चालक/वाहकांना गादी, बेड किंवा आरामदायक सोयी उपलब्ध करुन देणे बाबत दि. ३०/०१/२०२५ रोजी पत्राद्वारे कळिवले होते.परंतु वाहक चालकांना अद्याप पर्यंत झोपण्याची कोणतीही सुविधा नाही. विभागीय भांडार अधिकारी/विभागीय अधिकारी यांच्या कडून विभाग नियंत्रकांच्या आदेशाला केराची टोपली दाखवण्यात आली आहे. प्रवाशांना सुरक्षित गंतव्यस्थानी पोहोचवणारे चालक-वाहक मात्र स्वतःच अत्यंत हालअपेष्टा सहन करत असल्याने एसटी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत अन्यथा तिव्र आंदोलन छेडण्यात येईल अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते यांनी केली आहे.

## पती बाहेरगावी असल्याची संधी साधत महिलेचा विनयभंगआरोपीवर गुन्हा दाखल

■पातुर,दि २८ (प्रतिनिधी) :
तालुक्यातील एका गावात महिलेचा पती बाहेरगावी असल्याची संधी साधत तिचा विनयभंग केल्याची संतापजनक घटना २६ नोव्हेंबर रोजी घडली आहे. या प्रकरणी पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीवरून पातूर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिलेचा



पती गेल्या दोन महिन्यांपासून कामानिमित्त बाहेरगावी राहत आहे. हीच संधी साधून आरोपीने महिलेवर पाळत ठेवली होती. २६ नोव्हेंबर रोजी सकाळी महिला आपल्या घराच्या अंगणात कपडे वाळत घालत असताना, आरोपी संजय गोविंदा मोरे (४५) याने तिथे येऊन तिचा विनयभंग केला. फिर्यादी महिलेने दिलेल्या माहितीनुसार, आरोपी संजय मोरे हा तिला यापूर्वीही त्रास देत होता. मात्र, मंगळवारी त्याने थेट विनयभंग केल्याने महिलेने पोलीस ठाण्यात धाव घेतली. महिलेच्या तक्रारीची दखल घेत पातूर पोलिसांनी आरोपी संजय मोरे याच्याविरुद्ध कलम ७४ आणिएस कलम ३५१ (२) अंतर्गत विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पातूर पोलीस करीत आहेत.

## पातूर–वाडेगाव मार्गावर दोन ट्रकची धडक

पातूर : वाडेगाव मार्गावर दोन ट्रकांची समोरासमोर धडक होऊन मोठा अपघात झाल्याची घटना बुधवार दि. २६ नोव्हेंबर रोजीच्या रात्री ९ वाजताच्या सुमारास घडली, यात सुदैवाने जीवितहानी टळली. मिळालेल्या माहितीनुसार,बाळापूरहूनपातूरकडे जातअसलेल्या ट्रकाला विरुद्ध दिशेने येणाऱ्या ट्रकने जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले.

अपघात झाल्यानंतर रस्त्याजवळ असलेल्या हिंगणा येथील काही तरुणांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत दोन्ही चालकांना सुरक्षित बाहेर काढले. त्यांच्या वेळेवर दाखवलेल्या जागरूकतेमुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळल्याचे सांगितले जात आहे. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थांनीह मदतकार्याला हातभार लावला.

पोलिसांनी तत्काळ घटनास्थळ गाठून अपघात झालेल्या दोन्ही ट्रकांचा पंचनामा केला असून, पुढील तपास पातूर पोलिस करीत आहे.

## वृत्ती निवृत्त झाल्यावरच प्रभू कृपा संभव –पु.गोपाल महाराज



### जवाहर नगर भागवत कथा पुष्प ४

■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :

जीवनाच्या रहाटगाडग्यातून कायमचे मुक्त होऊन भगवंतांची स्थायी कृपा हवी असेल तर प्रथम मनातून आपली वृत्ती निवृत्त होने आवश्यक आहे. ही वृत्ती निर्विकार होऊन ती स्थिर झाली की भगवतांची आपोआप कृपा होते म्हणून जीवनात स्थिर वृत्ती आत्मसात करून प्रभू प्राप्ती करण्याचा हितोपदेश वेदांताचार्य बालयोगी गोपाल महाराज कारखेड कर यांनी केला.आशिष पवित्रकार मित्र परिवार व भागवत सेवा समिती च्या वतीने गुरुवर्य संत वासुदेव महाराज यांच्या स्मरणार्थ व स्व बाबुराव पवित्रकार यांच्या स्मृतीत जवाहर नगर येथील छत्रपती राजे संभाजी पार्क येथे सुरू असलेल्या वेदांताचार्य बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर यांच्या श्रीमदब भागवत कथेत त्यांनी कथेचे चतुर्थ पुष्प गुंफले.ते म्हणाले,

वृत्तीला भक्तीत स्थिर करण्यासाठी असंग व्हावे लागते ज्याप्रमाणे वायू हा सर्वत्र असूनही असंग असतो.तो कुणाचा संग करीत नाही. तशी भक्तांची वृत्ती असावयास हवी.अश्या या वृत्तीला निवृत्त करण्यासाठी प्रथम सद्गुणांची आवश्यकता आहे.यासाठी प्रथम कुणाचेही वाईट करू नये व चिंतु नये हा प्रथम टप्पा असल्याचे गोपाल महाराज यांनी यावेळी सांगितले.यावेळी त्यांनी श्रीरामाच्या प्रारंब्ध ने आलेला चौदा वर्षाचा वनवास कथन केला.ते म्हणाले प्रभात काळी मृत्यूचे स्मरण करा.असे केल्याने आपल्या हातून पाप होणार नाही. केलेले कर्म केवळ सोबत येते व चितेत शरीर भस्म होते.यावेळी त्यांनी भक्तीची आपल्या संगीतमय वाणीने मीमांसा करीत भागवतची महिमा सुखदेवांच्या अनुषंगाने प्रतिपादित करीत भक्तिमय वातावरणची निर्मिती करीत जीवन मूल्य सांगून सत्राला विराम दिला.

सत्र प्रारंभी सर्वप्रथम पु गोपाल महाराज यांचे स्वागत जाधव,भास्कर ताले,रमेश पाचपोर,हरीश आलिमचंदानी, हरीश लाखानी,संदीप वानखडे, भाऊ पाटील, श्रीकांत एखंडे,हेमेन्द्र राजगुरू आदींनी केले.तर आरतीत पोलिस निरीक्षक मालती कयाते,डॉ प्रवीण साखरकर, डॉ नवल मानधने,डो सागर ताले,डॉ गोविंद खंडेलवाल, गजानन कुटे, महेंद्र पागृत, राजू ओळंबे, ऋषिकेश नावकार, निरंजन अग्रवाल,आलोक अग्रवाल,भास्कर पागृत, अभियंता अमोल डोईफोडे,अतुल भुयार,नितीन धात्रक, दिनेश तरले, सुनंदा मुकुंदे,सुरेखा घोडे,मोरेताई, वरठी ताई आदीनी सहभाग घेत सत्राचे समापन केले.संचालन जीवन देशमुख यांनी केले. दि २ डिसेंबर रोजी साय ६ वाजता हभप ज्ञानेश्वर महाराज वाघ यांच्या काल्याच्या कीर्तनाने या उत्सवाची पूर्णाहुती होणार आहे. दि १ डिसेंबर पर्यंत नित्य साय ७ ते रात्री १० वाजेपर्यंत जवाहर नगर येथील छत्रपती राजे संभाजी पार्क येथे आयोजित या भागवत कथेचा समस्त भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन शिवलाल बोर्डे,डॉ राम पागृत, रामभाऊ पाटील, हरिदास मीसुरकर, हरिश्चंद्र पिसे,दिलीप अग्रवाल,महेंद्र राठी,प्रा विजय काटे, सुनील फोकमारे, नंदकिशोर ढोकने,राजेंद्र तरोळे, ज्ञानदेव,झटाले,ज्ञानेश्वर

## प्रचाराची मुदत १ डिसेबर रात्री १० वाजेपर्यंत

■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :

नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होत असून, त्यासाठीच्या जाहीर प्रचाराची मुदत 'महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५' मधील तरतुदीनुसार १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० पर्यंत असेल.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांस संबंधित कायद्यांमधील तरतुदींनुसार घेतल्या जातात. नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसंदर्भातील कायद्यात जाहीर प्रचाराचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार मतदान सुरू होण्याच्या अगोदरच्या दिवशी म्हणजे १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजल्यापासून प्रचार पूर्णपणे बंद होईल. त्यानंतर प्रचारसभा, मोर्चे आणि ध्वनिक्षेपकाचा वापर करता येणार नाही. त्याचबरोबर निवडणूक प्रचाराशी संबंधित जाहिरातींची प्रसिद्धी किंवा प्रसारण करता येणार नाही.

## इस्रोच्या विमान वारीसाठी बोरगाव वैराळे शाळेतील दोन विद्यार्थिनिंची निवड;अभिमानाचा क्षण!

### आकाशापलीकडचा प्रवास आता शाळेपासून सुरू!



■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :

बोरगाव वैराले येथील जि प शाळेतील दोन प्रतिभावान विद्यार्थिनी कु अन्वी गोपाल बाहकर इयत्ता सहावी व कू. रिया संदीप सूर्यवंशी इयत्ता सातवी यांची भारतीय अवकाश संशोधन संस्था (ISRO) येथे अकोला जिल्हा परिषद आयोजित विमान वारी निवड चाचणीङ्ग यशस्वीपणे पार करत इस्रोच्या विशेष शैक्षणिक अवकाश वारीसाठी आपली जागा निश्चित केली आहे. हे शाळेसाठी अत्यंत गौरवाचे आणि अभिमानाचे क्षण आहेत.या चाचणीमध्ये जिल्ह्यातून २१०विद्यार्थी सहभागी झाले होते. यात विज्ञान आणि गणित विषयावर विद्यार्थ्यांची निवड चाचणी घेण्यात आली. निवड चाचणीत शाळेच्या या विद्यार्थ्यांनी आपल्या आत्मविश्वास, अभ्यास व चिकाटीच्या जोरावर उत्तुंग यश संपादन केले.या वारीमध्ये विद्यार्थ्यांना खडठज च्या विविध प्रकल्पांचे प्रात्यक्षिक, रॉकेट व सॅटेलाइट निर्मिती प्रक्रियेची माहिती, शास्त्रज्ञांशी थेट संवाद, तसेच अवकाश विज्ञानातील अद्ययावत प्रयोगशाळा आणि लॉन्चिंग स्टेशनची भेट घेण्याची संधी मिळणार आहे. ही वारी त्यांच्यासाठी विज्ञानजगताकडे नेणारी प्रेरणादायी वाट ठरणार आहे.शाळेतील सर्व शिक्षक, पालक, मित्रमंडळी आणि स्थानिक समाजातून या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन होत आहे. त्यांच्या पुढील प्रवासासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## रामदास पेठ पोलीस स्टेशन येथे शहिदांना श्रद्धांजली

■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :

२६ नोव्हेंबर २०२५ रोजी रामदास पेठ पोलीस स्टेशन येथे स्नेहालय मतिमंद बहुउद्देशीय संस्थेकडून २६ ११ च्या ताज हल्लयात शहीद झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांना श्रद्धांजली देण्यासाठी रामदास पेठ पोलीस स्टेशन येथे सर्व पोलीस अधिकाऱ्यांसोबत श्रद्धांजलीचा कार्यक्रम साजरा करण्यात आला त्याचबरोबर आपल्या सुरक्षितेसाठी अहोरात्र झटणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले या कार्यक्रमांमध्ये रामदास पेठ पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक जोगदंड सर तसेच पोलीस उपनिरीक्षक इंगळे सर सुजित अरखराव सर अतुल बावणे सर जगदीश इंगळे सर सिद्धार्थ जंजाळ सर विजय गावंडे सर रोशन चटले सर तुळशीराम भवर सर उपस्थित होते.

## श्री नाथ दत्त मंदिर येथे श्री दत्त जन्मोत्सवाचे आयोजन

■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :

स्थानिक रामदास पेठ भागातील पुरातन श्री नाथ दत्त मंदिर येथे दिनांक २८ नोव्हेंबर ते ०४ डिसेंबर २०२५० दरम्यान श्री दत्त जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या दरम्यान दररोज विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या कालावधीत सकाळी ०९.३० ते १२.३० वाजता धडाधडी गुरुजी हे श्री गुरुचरित्र ग्रंथाचे प्रकट वाचन करतील व रोज सायंकाळी भाविक भक्तांना मुंबई येथील ह. भ. प. सौ. मंजुषा ताई भाभे यांचा सुश्राव्य कीर्तनाचा आनंद घेता येईल. तसेच रोज दुपारी ३ ते ५ वाजे दरम्यान शहरातील विविध भजनी मंडळांचे भजनांचा कार्यक्रम ही आयोजित करण्यात आलेला आहे. दिनांक ०४ डिसेंबर रोजी श्री दत्त जयंती चे दिवशी सकाळी लघुरुद्र होईल दुपारी श्री गुरुचरित्र पारायण समाप्तीनंतर पूर्णारती भजन होईल व सायंकाळी श्री दत्त जन्मोत्सव पार पडेल व यानंतर सायंकाळी ०७ वाजता भुसावळ येथील गोडबोले बँड पार्टी यांचे बँड प्रदर्शनाचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. भाविक भक्तांना सायंकाळी ०६.०० ते १०.०० पर्यंत श्री दत्त गुरुंचे दर्शनाचा लाभ घेता येईल. दिनांक ०५ डिसेंबर रोजी दुपारी ११ ते २ वाजेपर्यंत भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या महोत्सवात जास्तीत जास्त भक्तांनी सहभाग घ्यावा असे आवाह विनंती श्री नाथ दत्त मंदिर संस्थानाचे अध्यक्ष निशिकांत पुजारी यांनी केलेले आहे.

## पोलीस स्टेशन अकोट शहर ची दारू ची धडक कार्यवाह

# देशी दारू चा ९१,९०० रूपयाचा मुद्देमाल जप्त

■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :

हकीकत अशा प्रकारे की, दि २८/११/२०२५ रोजी गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहिती वरून पो.स्टे अकोट शहर चे डि. बी पथक चे प्रमुख पोउपनि वैभव तायडे सोबत नापोकॉ विपुल सोळंके व पोकॉ अश्विन चौव्हाण असे मिळालेल्या माहिती प्रमाणे कृषी उत्पन्न बाजार समिती अकोट समोर येथे दोन पंचासोबत थांबुन माहिती प्रमाणे एक इसम त्याचे मोटर सायकलवर कलदार चौकाकडून येतांना दिसला सदर इसमास पो. स्टॉफ च्या मदतीने थांबवुन त्यास पंचासमक्ष नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव



नारायण भिकाजी चंदन वय ४५ वर्ष रा. बोर्डी ता. अकोट जि. अकोला असे सांगितले व पंचासमक्ष त्याचे जवळ असलेल्या नायलॉन थैलीची पाहणी केली असता त्यामध्ये १) १३८ नग कोकण संत्रा देशी दारू ९० एम एल चे सिलबंद क्वाटर किं ६,९०० /- रू, २) एक काळया रंगाची हिरो कंपनीची स्प्लेंडर प्लस के एम एच ३० सीए ०३६५ किं अं ७०,०००/- रू ३) एक ओपो कंपनीचा केशरी रंगाचा मोबाईल जुना वापरता किं अं १५,०००/-रू असा एकुण ९१,९००/- रू चा मुद्देमाल जप्ती पत्रका प्रमाणे पंचासमक्ष जप्त करून ताब्यात घेतला वरून पो.स्टे अकोट शहर येथे अप नं ४४८ / २०२५ कलम ६५(ई) म.दा.का प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील कार्यवाही करीत आहो.

सदरची कारवाई केली.

## सावित्रीबाई फुले विद्यालय पातुर येथे संविधान दिन उत्साहात साजरा

■पातुर,दि २८ (प्रतिनिधी) :

दिनांक २६ नोव्हेंबर भारतीय संविधान दिनाच्या अनुषंगाने पातुर येथील सावित्रीबाई फुले प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात विविध उपक्रमाच्या स्वरूपाने हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून संस्थेच्या अध्यक्ष सौ.सपना म्हैसने , सचिव सचिन ढोणे,प्रमुख पाहुणे म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक जे . डी.कंकाळ तसेच अतिथी म्हणून दिवानी न्यायालय पातुर चे एडवोकेट आकाश हिवराळे व मंगल वानखडे यांची प्रमुख उपस्थिती होती. मंगल वानखडे यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता व तसेच बालकांच्या मोफत शिक्षणाचा अधिकार, समानतेचा अधिकार तसेच आकाश हिवराळे यांनी कलम १४ ,१५ व १६ याबद्दल विद्यार्थ्यांना चांगले मार्गदर्शन केले तसेच आज या कार्यक्रमानिमित्त वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम शाळेने सादर करून



त्यामध्ये सकाळी प्रस्ताविकाचे वाचन,गावातून भव्य दिव्य अशी रॅली , पोस्टर स्पर्धा असे विविध कार्यक्रम घेऊन भारतीय संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे संचालन उद्धव काळपांडे,आभार प्रदर्शन श्रीकृष्ण शेगोकार यांनी केले तसेच कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## मेगा रिटेल क्रेडिट आउटरिच कार्यक्रम उत्साहात

■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :

सेंट्रल बँक ऑफ इंडिया, प्रादेशिक कार्यालय अकोला तर्फे मेगा रिटेल क्रेडिट आउटरिच कार्यक्रम उत्साहात पार पडलासेंट्रल बँक ऑफ इंडिया, प्रादेशिक कार्यालय अकोला यांच्या वतीने आयोजित मेगा रिटेल कर्ज आउटरिच कार्यक्रम आज दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ रोजी व्हीनस इंटरनॅशनल हॉटेल, अकोला येथे उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला. कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून श्री. सुनील इन्नानी, अध्यक्ष - छअठएऊज अकोला, श्री. सुमित हातेकर, अध्यक्ष - उठएऊअख अकोला, श्री. अभिजीत परांजपे, चेअरमन - अउउए अकोला, श्री. अमित राठी, अध्यक्ष - खखअ अकोला, श्री. वसंतकुमार खांडेलवाल, मालक - मारुती सुझुकी अरेना यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली व मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे




आयोजन श्री. पंकज कुमार, क्षेत्रीय प्रमुख, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, अकोला यांनी केले. त्यांनी या उपक्रमाचे महत्त्व स्पष्ट करताना अधिकाधिक नागरिकांना बँकेच्या विविध योजनांशी जोडण्याचे आवाहन केले.ग्राहक संवाद सत्रात मा. श्री. अभिषेक कुमार, मुख्य व्यवस्थापक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांनी उपस्थित ग्राहकांशी संवाद साधून त्यांच्या आर्थिक गरजांचा आढावा घेतला व त्यांच्या शंकांचे निरसन केले.या कार्यक्रमात सेंट गृहकर्ज, सेंट वाहन कर्ज, सेंट वैयक्तिक कर्ज, सेंट शिक्षण कर्ज, सेंट सोनेतारण कर्ज तसेच बांधकाम व्यावसायिक प्रकल्प कर्ज योजना याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.कार्यक्रमादरम्यान पात्र लाभार्थ्यांना विविध रिटेल कर्ज योजनांअंतर्गत रु. २५.०० कोटींच्या मंजुरीपत्रांचे व धनादेशांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.


**CHANGE IN NAME**

I Have Change My Name From-
**SHRADDHA DEWANAND TAYADE**
- TO
**SHRADDHA DEVANAND TAYADE**
My Residential Address is - Renuka Nagar Dabki road Akola 444002

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name From-
**NAKUL NITIN DEHANKAR**
- TO
**VEDANT NITINRAO DEHANKAR**
My Residential Address is - Hariom Residency, Duplex No C2, Vrundavan Nagar , Umari.Pr. Akola 444005

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name From-
**SHIJAVI UTTAMRAO MEHESARE**
- TO
**SHIVAJI UTTAMRAO MEHESARE**
PASSPORT NO :-
**AJ301583**
My Residential Address is - AT. Post Rail, Akot TQ. Akot Akola 444111

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in My Passport :-
**(S2874714)**
---------From----------
**ABDUL KHALIQ ABDUL HAMID**
---------TO--------------
**ABDUL KHALIQUE ABDUL HAMEED**
My DOB is :- 05/06/1958
My Residential Address is :- Flat No 1 Shaheen Apartment Mohta Mill Road Firdous Colony Akola Maharashtra 444001.


## निधन वार्ता

### सौ. श्यामला कानेटकर



**अकोला** : लक्ष्मीकांत (बबनराव) कानेटकर यांच्या धर्मपत्नी सौ. श्यामला आज सकाळी पुणे येथे यांचे निधन झाले . उद्या शनिवार दि. २९ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता त्यांची अंत्ययात्रा गोरक्षण मार्गावरील त्यांच्या निवासस्थानावरून निघून सिंधी कॅम्प मोक्षधाम येथे त्यांचे वर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## ऑल इंडिया एससी एसटी रेल्वे एम्प्लॉईज असोसिएशन, दक्षिण मध्य रेल्वे अकोला शाखे तर्फे भारतीय संविधान दिवस साजरा

■अकोला,दि २८ (प्रतिनिधी)

स्थानिक अकोला येथे ऑल इंडिया एससी/एसटी रेल्वे एम्प्लॉईज असोसिएशन, (दक्षिण मध्य रेल्वे) शाखा अकोल्याच्या वतीने संविधान दिवस कार्यक्रम आयोजित करण्यात आला. संविधानाच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलित करण्यात आले, कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मा.प्रकाश बोदोडे (उद्ध) यांनी संविधान दिनानिमित्त मार्गदर्शन केले, व भारतीय संविधानाची उद्देशिकेचे सर्व रेल्वे कर्मचारी यांनी वाचन केले, आणि २६/११ च्या बॉम्ब हल्लयातील शहीद जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली सुद्धा देण्यात आली, पुढे प्रकाश बोदोडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, संविधान दिन, ज्याला 'संविधान दिवस' म्हणूनही संपूर्ण विश्वामध्ये ओळखले जाते, तो दरवर्षी २६ नोव्हेंबर रोजी भारतीय संविधान स्वीकारल्याच्या स्मरणार्थ आपल्या देशात मोठ्या उत्साहाने



साजरा केला जातो. दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी, भारताच्या संविधान सभेने भारतीय संविधान स्वीकारले, जे दि २६ जानेवारी १९५० पासून भारत देशात लागू झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अथक परिश्रमामुळे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजनैतिक न्याय समानता, सामान्य जनतेला मूलभूत हक्क संविधानाद्वारे प्रदान करण्यात आले, 'संविधान या देशाचा सर्वोत्तम सन्मान आहे,' असे सांगितले,या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने रेल्वे कर्मचारी उपस्थित होते, यामध्ये रेल्वेचे वरिष्ठ कार्यकर्ता आर.एन. बोदोडे, शुद्धोधन अबगड, सुनील लोंढे, रामदास हटकर, सतीश भिमटे ललित चौधरी, अजय पाहुरकर, संतोष मोरे, सिद्धार्थ बोदोडे आदि उपस्थित होते.

## मुलींनी आरोग्याच्या बाबतीत अतिदक्ष रहावे पल्लवी गिरी यांनी केले मार्गदर्शन



■पारस,दि २८ (प्रतिनिधी) : सखी सावित्री समितीच्या अंतर्गत मुलींना विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. कम्युनिटी हेल्थ ऑफिसर प्राथमिक आरोग्य केंद्र पारस पल्लवी गिरी यांनी मुलींना आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. तसेच दैनंदिन जीवनात जीवन जगत असताना मुलींना येणाऱ्या समस्यांबाबत त्यांनी अतिदक्ष राहून आपल्या समस्यांबाबत त्वरित आरोग्य अधिकाऱ्यांचा सल्ला घ्यावा. तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांना न विचारता कुठल्याही प्रकारचे मेडिकल आपण घेऊ नये, असा मोलाचा सल्ला सुद्धा यावेळी देण्यात आला.मुलींना दैनंदिन जीवनात ज्या समस्या येतात त्याबाबत त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊन त्यांना येणाऱ्या अडचणीचे निरसन करण्यात आले. तसेच ॲनिमिया मुक्त भारत या विषयी माहिती देण्यात आली.


RNI NO-46973/1986

Mahasagar Akola

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८

महासागर अकोला

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, ेमला स्क्रेअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील )**

# ठक्कर बाप्पा : समाजसुधारणेचे मानवतावादी रूप

भारतीय समाजाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात जी केवळ नावाने नाही तर त्यांच्या कृतींनी, त्यांच्या जीवनतत्त्वांनी आणि त्यांच्या समाजकार्याच्या विचारधारेमुळे लोकांच्या मनात कायमस्वरूपी जडतात. समाजातील वंचित, पीडित, व दलित घटकांच्या पुनर्वसनासाठी आपले संपूर्ण आयुष्य झिजवणाऱ्या, आयुष्यभर जनसेवा करत राहणाऱ्या, शाळा, वसतिगृहे, उद्योग, वस्ती, रुग्णालये यांची पायाभरणी करणाऱ्या कर्मयोग्यांपैकी एक म्हणजे अर्थातच ठाकुरजी झवेरभाई मोवजीवाला, म्हणजेच संपूर्ण भारताला परिचित असलेले ठक्कर बाप्पा. त्यांचे कार्य सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रात इतके व्यापक होते की आजही आदिवासी, भटक्या व विमुक्त जमाती त्यांना देवदूत, समाजपिता, अथवा जीवंत गांधी म्हणून ओळखतात.

------------

ठक्कर बाप्पा यांचा जन्म २९ नोव्हेंबर १८६९ रोजी गुजरातमधील भागलपूर (जि. भावनगर) येथे झाला. त्यांनी अभियांत्रिकी शिक्षण घेतले आणि सरकारी नोकरीत प्रारंभिक काळ घालवला. परंतु १९१४ च्या सुमारास ब्रिटिशांच्या अंतर्गत कार्यरत असताना त्यांनी प्रथमच आदिवासी भागात काम केले आणि त्या समाजातील दारिद्रय, अशिक्षितपणा, व्यसनाधीनता, अंधश्रद्धा आणि सामाजिक बहिष्काराचे परिणाम अतिशय जवळून पाहिले.

ही निरीक्षणे पुढे त्यांच्या जीवनातील धर्मवळण बनली. गांधीजींच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रेरणेखाली त्यांनी नोकरीचा राजीनामा देत वयाच्या ५० व्या वर्षी संपूर्णपणे समाजकायाला वाहून घेतलेले जीवन सुरू केले. हीच ठक्कर बाप्पांच्या कार्याची खरी सुरुवात होती.

त्यांनी भारतातील आदिवासी समाजाकडे सुधारणा किंवा मदतीची गरज असलेल्या जमातींसारखे पाहिले नाही, तर त्या समाजाला भारताचे आदिम नागरिक, संस्कृतीचे वारकरी आणि निसगार्चे जिवंत शिलेदार म्हणून मान्यता दिली. त्यांच्या कार्याची मुळे सामाजिक न्याय, समता, अहिंसा आणि मानवी प्रतिष्ठेच्या तत्त्वांमध्ये खोलवर रोवली गेली होती.

ते म्हणत ज्या समाजाला आपण मदत करत आहोत, तो गरिब आहे म्हणून नव्हे, तर त्याच्यात प्रचंड सांस्कृतिक वारसा आहे म्हणून त्याला साथ देणे आवश्यक आहे.

ठक्कर बाप्पांनी मानवसेवेला कोणतेही राजकारणाचे स्वरूप दिले नाही. देशभरात त्यांनी ४०० हून अधिक संस्था, शाळा, गुरुकुल, पुनर्वसन केंद्रे, वसतिगृहे आणि आश्रमशाळा उभारल्या.

सुरुवातीला गुजरात, नंतर महाराष्ट्र, आदिवासी बहुल विदर्भ, मध्यप्रदेश, छत्तीसगड, राजस्थान आणि उत्तर भारतात त्यांनी कामाचा व्याप्तीक्षेत्र विस्तारत नेला. भारतातील भटक्या आणि विमुक्त जमाती त्या काळी British Criminal Tribes Act-1871 अंतर्गत जन्मजात गुन्हेगार म्हणून घोषित होत्या.

हे अन्यायकारक कायदे आणि सामाजिक बहिष्कार ठक्कर बाप्पांना अमानुष वाटत होते. त्यांनी या समाजाच्या पुनर्वसनासाठी मोठ्या प्रमाणात मोहीम राबविली. पुनर्वसनशिबिरे, शिक्षण, आरोग्यसेवा, शेतीप्रशिक्षण आणि स्वावलंबनासाठी उद्योगप्रशिक्षण उपलब्ध करून दिले.

आदिवासी भागातील महिलांची स्थिती अत्यंत दयनीय होती. त्या शिक्षणापासून, आरोग्यसेवेपासून आणि सामाजिक समानतेपासून वंचित होत्या. ठक्कर बाप्पांनी महिला सक्षमीकरणासाठी विशेष प्रयत्न केले.




त्यांना वाटत होते की समाज बदलायचा असेल तर महिला आणि मुलांचे शिक्षण अत्यावश्यक आहे. म्हणून त्यांनी मुलींसाठी स्वतंत्र आश्रमशाळा सुरू केल्या. ग्रामीण भागातील पारंपरिक जन्ममृत्यू विधी, मातृआरोग्य, अपोषण, व्यसनाधीनता आणि रोगप्रतिबंधक उपाययोजनांना त्यांनी प्रोत्साहन दिले.

ठक्कर बाप्पांचे कार्य केवळ शिक्षणापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी आदिवासी भागात जलसंधारण, सिंचन, शेतीसुधारणा, हस्तकला, विणकाम, बागायती, पशुपालन आणि उद्योगक्षेत्रात देखील कार्य केले. त्यांच्या कार्यातून जन्माला आलेल्या उद्योग केंद्रांनी अनेक आदिवासी कुटुंबांना स्वावलंबन दिले. त्यांच्या दृष्टीने सेवा म्हणजे केवळ दान नव्हे तर सक्षमीकरण, आत्मनिर्भरता आणि स्वाभिमान निर्माण करणे हा उद्देश होता.

ते म्हणतः ज्याला आपण मदत देतो, त्याच्या आत्मसन्मानाची राख राखली पाहिजे, मशाल देणे हे भिक मागण्यापेक्षा श्रेष्ठ आहे.

त्यांनी सुरू केलेला भिल सेवा मंडळ, भील सेवा संघ, तसेच नंतर स्थापन झालेले ह्वठक्कर बाप्पा आदिवासी विकास महामंडळ्व यासारख्या उपक्रमांनी आदिवासी समाजात नवचैतन्य निर्माण केले. त्यांच्या कायार्मुळे आदिवासी समाजाच्या शिक्षणात वाढ, आरोग्यात सुधारणा, अंधश्रद्धेपासून मुक्ती, कायदेशीर हक्कांविषयी जागरूकता आणि आर्थिक विकास शक्य झाला.

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातही त्यांनी अप्रत्यक्षपणे योगदान दिले. गांधीजींच्या असहकार आंदोलनात सहभागी होताना त्यांचे सामाजिक कार्यच सत्याग्रहाचे रूप घेतले. गांधीजी म्हणाले होतेः जर मी स्वतःला गांधी मानत असेन तर ठक्कर बाप्पा हे प्रत्यक्ष गांधी आहेत.



डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२
bagate.rajendra5@gmail.com
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

१९५१ साली ठक्कर बाप्पा यांच्या निधनानंतरही त्यांचे कार्य थांबले नाही. त्यांनी निर्माण केलेल्या चळवळी, संस्थात्मक पायाभूत रचना आणि विचारधारा आजही सरकारी पातळीवर आणि स्वयंसेवी क्षेत्रात मार्गदर्शक ठरतात.

आज हजारो आश्रमशाळा, विद्यार्थी वसतिगृहे, आदिवासी विकास महामंडळे आणि शासकीय धोरणे त्यांच्या विचारांनी प्रभावित होऊन कार्यरत आहेत.

ठक्कर बाप्पांचे जीवन आपल्याला स्मरण करून देते की समाजातील दुर्लक्षितांसाठी काम करणे म्हणजे केवळ दानधर्म नव्हे, तर समतेची आणि मानवतेची उभारणी करणे होय. त्यांच्या कार्यातून हे सिद्ध झाले की नियोजनबद्ध सेवा, मानवी दृष्टीकोन, सन्मानाधारित सुधारणा आणि लोकशाही मूल्ये या आधारे सामाजिक बदल साधता येऊ शकतो. आज जेव्हा समाज पुन्हा जात, धर्म, आर्थिक विषमता, अंधश्रद्धा आणि असमानतेच्या आव्हानाला सामोरे जात आहे, तेव्हा ठक्कर बाप्पांचे कार्य अधिक अर्थपूर्ण वाटते.

त्यांची जयंती म्हणजे केवळ स्मरणाचा दिवस नसून मानवता, समर्पण, त्याग आणि सामाजिक बांधिलकीचा प्रेरणादिवस आहे. ठक्कर बाप्पांना खरी श्रद्धांजली म्हणजे त्यांच्या सुरू केलेल्या कायार्चा वारसा पुढे नेणे, आदिवासी समाजाला केवळ शासकीय लाभांच्या चौकटीत न ठेवता त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करणे आणि त्यांच्या संस्कतीला सन्मानाने स्थान देणे. आज त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या विचारांचा पुनरुच्चार केला पाहिजे, मानवतेपेक्षा मोठा धर्म नाही, आणि सेवेशिवाय मानवता अपूर्ण आहे.

# वऱ्हाडरत्न साहित्यिक डॉ. मिर्झा रफी बेग

महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध साहित्यिक, कवी, मिर्झा एक्सप्रेस फेम, हास्यसम्राट डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांच्या निधनाने साहित्य विश्वावर व रसिकांवर शोककळा पसरली. यवतमाळ जिल्ह्यातील नेर परसोपंत तालुक्यातील धनज माणिकवाडा हे त्यांचे मूळ गाव होते.

वऱ्हाडी बोलीभाषेला लोकमंचावर नेणारे मोजक्या साहित्यिकांपैकी डॉ. मिर्झा बेग हे अग्रणी होत. अस्सल वऱ्हाडी बोलीतून खुमासदार सादरीकरण करण्याची शैली हेच त्यांचे वैशिष्ट्य होय.



किशोरास्थेत डॉ.बेग काव्य लेखनाकडे वळलेत. साधारणतः सत्तरच्या दशकात आपल्या वऱ्हाडी काव्यरचना लोकमंचावर त्यांनी सादर करण्यास प्रारंभ केला.

डॉ. बेग यांनी प्रारंभी महाराष्ट्रातील अग्रणी वर्तमानपत्रात काव्य लेखनास प्रारंभ केला. 'मिर्झाजी कहीन' 'हाय राणी' 'जांगळबुत्ता' 'मिर्झा एक्सप्रेस' या शीर्षकांखाली ते वऱ्हाडी बोली भाषेतून स्तंभलेखन करायचे. हे स्तंभलेखन तुफान लोकप्रिय ठरले.

देशाच्या राजधानी दिल्लीपासून,तर आर्थिक राजधानी मुंबईपर्यंत; आपल्या मायबोली वऱ्हाडी भाषेतून काव्यरचना करून लोकमंचावर सादर करण्याच्या तऱ्हेने ते गल्लीपासून दिल्लीपर्यंत सुप्रसिद्ध झालेत.

'जांगळबुत्ता' या वऱ्हाडी शब्दाचे जनक म्हणून त्यांना बघितले जाते. ग्रामीण भागातील समस्या, सामाजिक विषमता, बेरोजगारी, शेतकरी - शेतमजुरांच्या व्यथा, शेती, माती, संस्कृती आणि समाजजागृती हा त्यांच्या काव्य लेखनाचा केंद्रबिंदू होता.

विनोदी शैलीतून काव्य लेखनासोबतच त्यांचे काव्य मार्मिक, तार्किक आणि अंतमुख करणारे होते. त्यांनी आजपावतो विसहून अधिक काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. 'इरवा' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह होय. सगुना, मुगुट त्यांचे काव्यसंग्रह होय. तर गोंदन हा काव्यसंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर होता.

'मिर्झा एक्सप्रेस' या नावाने वर्तमानपत्रात वऱ्हाडी लेखन करून सदर लिहायचे. या सदराच्या लोकप्रियते नंतर लोकमंचावर 'मिर्झा एक्सप्रेस' या एकपात्री विनोदी प्रयोग सादर करत असत. महाराष्ट्रात सहा हजारांहून अधिक या प्रयोगांचे सादरीकरण झाले आहेत. या एकपात्री प्रयोगाने वऱ्हाडात ते 'मिर्झा एक्सप्रेस' म्हणून ओळखले जातात.

सातवा महिना.. उठ आता गणपत..आणि जांगळबुत्ता यासारख्या त्यांच्या वऱ्हाडी काव्यरचनेला रसिकांकडून उत्तम प्रतिसाद मिळत होता आणि त्या रचना लोकप्रिय ठरल्या. महाराष्ट्रातील साहित्यविश्वात त्यांनी अनेक मानाचे स्थान भूषविले आहे. ६४ व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्षही ते राहिले.



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९१३०८३५४५८

पंधरा वर्षांपूर्वी 'झी मराठी' दूरचित्रवाणीवर हास्यसम्राट हा विनोदी प्रायोजित कार्यक्रम प्रसारित व्हायचा. त्यात ते झळकले आणि संपूर्ण महाराष्ट्रात डॉ. मिर्झा बेग 'हास्यसम्राट' म्हणून प्रसिद्धीच्या झोतात आले.

अनेक दशके महाराष्ट्रातील जनतेला काव्यकलेच्या माध्यमातून खळखळून हसविणाऱ्या हरहुन्नरी साहित्यिक वऱ्हाडरत्न डॉ.बेग यांना काळाने हिरावून घेतले. त्यांना भावपूर्ण आदरांजली..!

■ ■ ■

# लाडकी बहीण ईकेवायसी एक जबरदस्त स्कॅम

**पूर्वार्ध**

शब्दस्पर्शी सुनील शिरपुरे
कमळवेल्ली, यवतमाळ.
७०५७१८५४७९

गेल्यावर्षी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' धुमधडाक्यात सुरू केली. महायुतीने सुरू केलेली 'लाडकी बहीण योजना' महाराष्ट्रात प्रचंड गाजली.

या योजनेच्या बळावर महायुतीने विधानसभेत घवघवीत यश मिळवत सत्तेच्या चाव्या परत मिळवल्या. सत्ताधा-यांनी याचे श्रेय राज्यातील महिलांना दिले आणि ते खरंही आहे. महायुती सरकारला शासन दरबारी बसवण्यात लाडक्या बहिणींचा खूप मोठा वाटा आहे. महाराष्ट्र सरकारने २८ जून २०२४ रोजी या योजनेला मंजुरी दिली आणि १८ ऑगस्ट २०२४ रोजी ही योजना सुरु केली. परंतु योजनेचे फायदे जुलै २०२४ पासून देण्यास सुरुवात केली.

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गातील २१ ते ६५ वयोगटातील महिलांना आर्थिक मदत पुरवण्यासाठी सुरु केलेली एक महत्त्वपूर्ण योजना आहे. महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य वाढवणे आणि सर्वांगीण विकास साधणे म्हणजेच राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करून कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करणे या उद्दिष्टांचा बनाव करून महाराष्ट्र सरकारने २०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या काही महिन्यांपूर्वी 'लाडकी बहीण योजना' सुरू केली होती.

महाराष्ट्रातील 'लाडकी बहीण योजना' निवडणुकीपूर्वी महिलांना भुलवण्यासाठी वापरण्यात आलेले एक षडयंत्र होते. त्याद्वारे १५०० रूपये हप्ता देण्यात आला. मात्र, निवडणुकीनंतर निधीअभावी हप्ते थकायला लागले. योजनेमुळे राज्याची आर्थिक स्थिती विस्कटली. यामुळे इतर खात्यांचा निधी वळवला जाऊ लागला. सरकारच्या या आर्थिक कोंडीमुळे लाडक्या बहिणींमध्ये नाराजी पसरली आणि २१०० चा हप्ता तर दुरच राहिला, पण सध्या काही बहिणींना १५०० चाही पत्ता नाही. राज्यावर कर्जाचा डोंगर वाढत राहिला आणि सरकार फक्त आश्वासने देत राहिली. ही 'लाडकी बहीण योजना' फक्त निवडणुकीसाठी वापरलेला एक स्कॅम आहे, असं म्हणायला हरकत नाही.

दुसऱ्या राज्याची संकल्पना उचलून महाराष्ट्रात महायुती सरकारने तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात 'लाडकी बहीण योजना' जाहीर केली आणि विधानसभा निवडणुकीच्या काही महिने आधी राज्यभरातील बहिणींना ३ महिन्यांचे प्रत्येकी १५०० प्रमाणे ४५०० खात्यात देऊन लाडक्या बहिणींच्या मतांची भाऊबीज आपल्या ओंजळीत घेतली. पण हीच 'लाडकी बहीण योजना' पुन्हा निवडून आल्यावर राज्य सरकारला महागात पडू लागली. ज्यामुळे राज्याची आर्थिक स्थिती विस्कटली.

'लाडकी बहीण योजना' ऐन निवडणुकीच्या तोंडावर जाहीर केल्यामुळे सरकारने होता नव्हता निधी वापरला. मात्र, पुन्हा निवडून आल्यावर काय करायचे? याचा विचार बहुधा केला गेला नव्हता. त्यातच पुन्हा सरकार यावे या हेतुने १५०० चा हप्ता थेट २१०० करण्याचे आश्वासन देऊन सरकार मोकळे झाले.

राज्यातील बहिणींनी त्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांना पुन्हा निवडून दिले. त्यानंतर मात्र महायुती सरकारची पंचायत होऊ लागली. या योजनेसाठी अर्थसंकल्पात तरतूदच केलेली नव्हती. मग काय, आर्थिक ताळमेळ बसवण्यासाठी इतर खात्यातील निधी वळवण्याची व पळवण्याची वेळ आली.

राज्यासमोर आर्थिक संकट वाढायला लागले. महसुली उत्पन्नापेक्षा खर्च जास्त आहे. कर्ज व व्याजापोटी मोठी रक्कम खर्च होत आहे. भांडवली खचार्साठी दुसरे कर्ज काढण्याशिवाय पर्याय नाही.

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

■ ■ ■

# मराठा युद्धनिती वापरून आर्थर वेलस्लीने केला नेपोलियनचा पराभव

ब्रिटनच्या इतिहासातील एक अत्यंत चाणाक्ष सेनापती, ब्रिटनचा पंतप्रधान म्हणून वेलस्ली याचे नाव प्रसिद्ध आहे. नेपोलियनसारख्या महान सेनापतीला त्याने वारंवार जेरीस आणले आणि 1815 च्या वॉटर्लूच्या युद्धात त्याचा अंतिम पराभव करून युरोपमधील नेपोलियनची सद्दी संपुष्टात आणली.त्याद्वारे जगाच्या इतिहासाला वेगळे वळण मिळाले.

भारतात वयाच्या 28 व्या वर्षी फेब्रुवारी 1797 मध्ये कर्नल म्हणून नियुक्त झालेल्या आर्थर वेलस्लीचा प्रवास इंग्लंडचा राजा लॉर्ड ऑर्थर वेलस्ली पर्यंत कसा झाला आणि या यशाचे गमक काय आहे. या यशापर्यंत पोहोचवण्याचे काम इंग्लंड मराठा युद्धात मराठ्यांनी वापरलेल्या युद्धनीतीचे आहे. ही अभिमानाची बाब आहे.

न चुकता दरवर्षी नोव्हेंबर महिन्यामध्ये 15 ते 20 ब्रिटिश नागरिकांचे शिष्टमंडळ भारतात येतात. अर्थर वेलस्लीने केलेल्या युद्धाच्या युद्धभूमीवर जातात. त्यांच्या पूर्वजांना श्रद्धांजली वाहण्यासाठी ब्रिटिश येतात असा समज भारतीयांचा आहे. ती एक बाजू आहे. पण दुसरी बाजू ब्रिटिश शिष्टमंडळातील मार्गदर्शक सेवानिवृत्त मेजर गॉर्डन कॉरिजन यांच्यासोबत याबाबत चर्चा केली असता समजली.



1797 मध्ये भारतात कर्नल म्हणून नियुक्त झालेल्या वेलस्लीने 1799 मध्ये मैसूरचे टिपू सुलतान यांचा पराभव केल्यानंतर वेलस्लीला मैसूरचा गव्हर्नर करण्यात आले आणि 1803 मध्ये मराठा युद्धाकरीता मेजर जनरल करण्यात आले. 1803 ची असाई ,अडगांव व गावीलगड येथील मराठा सोबतचे युद्ध त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारे ठरले.

या युद्धात मराठ्यांकडे अत्याधुनिक शस्त्र नसताना कशा पद्धतीने ते लढतात लढण्याची त्यांची पद्धत याचा त्याने बारकाईने अभ्यास केला विशेषता मराठ्यांची गनिमी कावा ही लढण्याची कला त्याने आत्मसात केली अतिशय विपरीत परिस्थितीत कठीण हवामानात रस्ते नसलेल्या कठीण प्रदेशात कसे काम करायचे आणि युद्धभूमीवर सैन्य कसे राखायचे सोबतच सैन्याला कसे तंदुरुस्त आणि निरोगी ठेवायचे हे त्यांनी आत्मसात केले. सोबतच युद्धादरम्यान मित्र राष्ट्राची मित्र राजांची सहकार्य कसे करायचे आणि घ्यायचे हे सुद्धा त्यांनी या ठिकाणी आत्मसात केले.

भारतात वेलस्लीने युद्ध करण्याची कला जेथे शिकली ते ठिकाण व तेथील भौगोलिक परिस्थिती व लढण्यासंदर्भाचे आराखडे याचा अभ्यास करण्यासाठी आम्ही भारतात येतो असे सेवानिवृत्त ब्रिटिश सैन्य अधिकारी मेजर गार्डन कोरिजन यांनी शिरसोली येथे शौर्य दिन आयोजनची भूमिका पार पाडणारे आर्किटेक्ट अनंत गावंडे यांच्याशी संवाद साधताना सांगितले.

भारतीय उत्सव प्रिय असतात मराठा शौर्य दिन साजरा करतात मराठा योद्धांना आदरांजली वाहतात. पण यासोबतच मराठ्यांनी युद्ध कसे लढले. त्यांची युद्धनिती कशी होती. या युद्धात गावकऱ्यांचा सहभाग कसा होता. महिला पुरुष खांद्याला खांदा लावून कसे युद्ध लढत होते. मराठा योद्धयांची कमीत कमी जीवित हानी कशी होईल हे तंत्र कोणते होते याचाही अभ्यास मराठा शौर्य दिनाच्या निमित्ताने व्हावयास हवा.

------------

पुरूषोत्तम ढोले, अकोला.

■ ■ ■

# गुरुचरित्र सप्ताह

**वाचक लिहितात**

मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशी मृग नक्षत्रावर सायंकाळी दत्ताचा जन्म झाला, म्हणून त्या दिवशी दत्ताचा जन्मोत्सव सर्व दत्तक्षेत्रांत साजरा होत असतो.

या उत्सवापूर्वी सात दिवस गुरुचरित्राचे पारायण करण्याचा प्रघात आहे. यालाच गुरुचरित्रसप्ताह असे म्हणतात. भगवान दत्तात्रेय यांच्याशी संबंधित दत्त संप्रदायाचा महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे श्री गुरुचरित्र हा होय. दत्त जयंतीपूर्वी सात दिवस दत्त भक्त (पुरुष) या गुरुचरित्र ग्रंथाचे काटेकोर नियम पाळून वाचन करतात.

दत्त जयंतीला या वाचनाचे पारणे करतात. श्री गुरुचरित्र हा श्रीदत्तात्रेयाचे अवतार मानल्या जाणाऱ्या श्रीनृसिंहसरस्वती यांच्याबद्दलचा चरित्रग्रंथ आहे. सरस्वती गंगाधर रचित हा ग्रंथ दत्त संप्रदायाच्या कथा सांगणारा आहे.

गुरुचरित्र या ग्रंथात एकूण ५२ अध्याय असून त्यात ७४९१ ओव्या आहेत. मंगलाचरण, गुरुभक्ती आणि गुरुप्रसाद हे या ग्रंथाचे प्रमुख विषय आहेत. व्यक्तीपेक्षा गुरू या पदाला आणि गुरु-शिष्य या नात्याला गुरुचरित्रात महत्त्व दिलेले आढळते. अवतरणिका असे विषय या ग्रंथामध्ये आहेत. गुरुची कृपा प्राप्त करणे, ऐहिक आणि पारमार्थिक जीवनातील यश मिळविणे याचे मार्गदर्शन करणारा हा ग्रंथ आहे. श्रीपाद श्रीवल्लभ आणि नृसिंह सरस्वती ही दोघेही दत्तात्रेय यांचा अवतार मानले गेले आहेत.त्यामुळे त्यांच्या विषयी या ग्रंथात विशेष वर्णन आलेले दिसून येते.

विविध व्रत- वैकल्ये, तीर्थक्षेत्र आणि यात्रा यांची वर्णने,यात सांगितले आहेत. त्या जोडीने अश्वस्थ, औदुंबर, भस्म इ. दत्त संप्रदायाशी संबंधित महत्त्वाच्या संकल्पना यात विशद केल्या आहेत, त्यांचे महत्त्व सांगितले गेले आहे. अंगाला भस्म विलेपन कसे करावे, शिवपूजा कशी करावी याचेही मार्गदर्शन ग्रंथात केलेले आहे. महिलांसाठी पातिव्रत्य आणि आतिथ्य म्हणजे अतिथी सत्कार याचे महत्त्व या ग्रंथाने विशद करून सांगितले आहे.

गुरुचरित्र या ग्रंथाचे पारायण हा दत्त संप्रदायातील महत्त्वाचा घटक मानला जातो. दररोज सकाळी स्नान करून संकल्प करावा. यासाठी कायम एकच आसन वापरावे. पारायण करणाऱ्या व्यक्तीने सात्त्विक आहार घ्यावा. दिवसभर नामस्मरण करावे. पारायण काळात घोंगडी पसरून जमिनीवर झोपावे. पारायण काळात शरीर, मन आणि बुद्धी यांची शुद्धता पाळावी.

दत्त जयंतीच्या दिवशी दत्ताची मनोभावे पूजा आणि नामजप केल्यास दत्त-तत्त्वाचा अधिकाधिक लाभ मिळण्यास मदत होते. श्री दत्त ही पूर्वजांना पुढील गती देणारी देवता आहे. श्री गुरुदेव दत्त । हा दत्ताचा नामजप आणि प्रार्थना अधिकाधिक करावी.दत्ताची भावपूर्ण पूजा आणि आरती करावी. सायंकाळी दत्त स्तोत्राचे पठण करावे,आणि दत्त प्रभुंची कृपा संपादन करावी.

■ सौ. वर्षा आवदे
नागपूर.

# विस्तारवादी चीनची क्रुरता

ब्रिटनमध्ये राहणाऱ्या एका भारतीय महिलेला २१ नोव्हेंबरला जपान मध्ये जात असताना, त्यांचे विमान चीनच्या शांघाय मध्ये तीन तासासाठी थांबले होते. त्यावेळी चीनच्या पासपोर्ट अधिकाऱ्यांनी त्या महिलेचे जन्मस्थान अरुणाचल प्रदेश असल्याचे पाहून त्यांचा भारतीय पासपोर्ट अवैध ठरवला आणि तो जप्त केला आणि त्या महिलेला विमानात बसू दिले नाही.

त्यावेळी तिथल्या बऱ्याच अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी त्यांची खिल्ली देखील उडवली. थोडा थोडका नव्हे तर तब्बल १८ तासांचा हा त्रास त्या महिलेला सोसावा लागला. त्या काळात त्यांना पाणी, जेवण आणि आराम यापैकी कोणती सुविधा दिली नाही आणि हे सर्व कशासाठी तर अरुणाचल प्रदेश हा चीनचा भाग आहे असे चीन समजतो आणि म्हणून तिचा भारतीय पासपोर्ट रद्द केला.

आज पर्यंत चीनने बरेच वेळा अशी आगळिक केली आहे. पण आता एका महिलेला बळजबरीने थांबवून त्रास देण्यापर्यंत त्याची मजल गेली आहे. एवढं करून सुद्धा चीनने महिलेने केलेले सर्व आरोप फेटाळले आहेत. याबाबत भारताने चीनला जाब विचारला पाहिजे. परराष्ट्र मंत्रालयाने अरुणाचल प्रदेश भारताचा अविभाज्य भाग आहे, हे सत्य नाकारू शकत नाही असे म्हटले आहे. परंतु एवढ्यावरच न थांबता भारताने चीनच्या वर्तनावर परराष्ट्रमंत्री किंवा पंतप्रधानांनी यावर निर्भीडपणे उत्तर दिले पाहिजे. तरच चीनची मग्रुरी थांबेल. अन्यथा येरे माझ्या मागल्या असे होईल. चीन पुन्हा पुन्हा कुरापती काढतच राहील. विस्तारवादी चिनी ड्रॅगनला कायमचा धडा शिकवण्यासाठी त्याचा चेहरा जगासमोर उघडा पाडणे आता आवश्यक झाले आहे .

■ सौ. माधवी पतकी, नागपूर.

# रात्री ढाराढूर झोपल्यावरही दुपारी झोप येते?



रात्री चांगली झोप झाली असली तरी अनेकदा काहींचा दिवसभरातही थकवा जात नाही. झोप झाल्यासारखं त्यांना वाटत नाही. त्यांचे सकाळी डोळे उघडत नाही. त्यांना पुन्हा झोपावं वाटतं. त्यांना आळस चढतो. त्यांना शारिरीक थकवाही जाणवतो. दिवसाही त्यांना अचानक डुलका लागतो. तर या लक्षणांना गांभीयार्नं घ्या. याकडे दुर्लक्ष करू नका. ही आरोग्याचे काही गंभीर कारणं दर्शवतात.

**यामुळे येते दिवसा झोप**

रात्री झोपल्यावरही काही जणांना दिवसा आळस झटकता येत नाही. त्यासाठी ते उत्तेजक पेय कॉपी चहा घेतात. अथवा एखाद्या कामात मन रमवण्याचा प्रयत्न करतात. पण त्याचा काही उपयोग होत नाही.

हे हायपरसोमनियाचे लक्षण मानल्या जाते. यामुळे व्यक्तीचा डोळाही कधी उघडत नाही. त्याच्या पापण्या जड पडतात. त्याची सुस्ती वाढते. त्याला दिवसभर जड झाल्यासारखं वाटतं.

**काय आहेत यामागील कारणं?**

जर रात्री झोप मोड होत असेल, लघवीसाठी वारंवार उठावं लागत असेल नियमित वेळेत झोप घेत नसाल. झोपेची वेळ पाळल्या जात नसेल.

झोपण्यापूर्वी पोटभर जेवण आणि मद्यपानाची सवय असेल.

झोपण्यापूर्वी मोबाईल पाहण्याचे वेड असेल.

कामाचा ताण-तणाव असेल, औषधांचा दुषपरिणाम. अथवा अधिक विचार, कुठल्यातरी गोष्टीचे दडपण चिंता सतावणे, हुरहुर वाटणे, अनामिक भीती

**यावर काय आहे उपाय?**

१. सर्वात अगोदर झोपेची एक निश्चित वेळ ठरवा. त्याचवेळेत झोपा.
२. पुरेशी झोप झाली की उठा, व्यायाम करा. ध्यानधारणा करा.
३. सकाळी अथवा संध्याकाळी फिरायला जा. चालणे हा चांगला व्यायाम मानल्या जातो.
४. रात्रीचे जेवण लवकर करा. पण प्रमाणाबाहेर जेवण टाळाच.
५. रात्री झोपण्यापूर्वी प्रार्थना, नामस्मरण करा
६. रात्री मद्यपान, धुम्रपान करत असाल तर ते टाळा.
७. झोपण्यापूर्वी टीव्ही अथवा मोबाईल पाहू नका.
८. तरीही सुधारणा होत नसेल तर मग वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला घ्या.
९. त्यांच्या सल्ल्याने योग्य औषधी घ्या.
१०. पुस्तक वाचण्याचा छंद जोपासा.

■ ■ ■

**अशोकायन**

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## अरे नाफेड नाफेड!

अरे नाफेड नाफेडं
अर्धा सिझन झालाय
तरी शासन उघडेना
बळीसाठी तुझे कवाडं..

वराती मागुन घोडे
सांगा काय कामाचे?
नाफेडपेक्षा भावांतर
योजना बळीच्या हिताचे..

बळीची सारी सोयाबीन
गेलीय व्यापाऱ्याच्या दारी
आता कुणाची सोया घ्याल
उघड गुपित सांगा तरी..



# बालांगण

## अनोखं जिम कॉर्बेट



भ्रमंती

जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यान म्हणजे प्राणीप्रेमी, निसर्गप्रेमींसाठी पर्वणीच. जेम्स एडवर्ड उर्फ जिम कॉर्बेट यांच्या नावाने हे राष्ट्रीय उद्यान ओळखलं जातं. जिम कॉर्बेट ब्रिटिश सैन्यात कर्नल होते. भारतावर इंग्रजांचं राज्य असताना ते भारतात होते. त्यावेळी जिम कॉर्बेट माणसांना खाणारे वाघ, बिबट्या अशा अत्यंत हिंस्त्र प्राण्यांची शिकार करत असत. पण काही वर्षांनंतर त्यांनी पर्यावरणरक्षणाचा वसा घेतला. पर्यावरणावर बरंच संशोधन केलं, काही पुस्तकं लिहिली. 'मॅन इटर्स ऑफ कुमाऊं' आणि 'जंगल लोर' अशी काही पुस्तकं त्यांनी लिहिली. त्या काळात त्यांच्या पुस्तकांना फारशी प्रसिद्धी मिळाली नव्हती. पण नंतर या पुस्तकांचं खूप कौतुक झालं. या पुस्तकांचा खपही बराच वाढला.

बंगालच्या ढाण्या वाघाच्या संरक्षणासाठी करण्यात आलेल्या व्याघ्र प्रकल्पाच्या उभारणीत जिम कॉर्बेट यांचा महत्त्वाचा वाटा होता. सुरूवातीला या राष्ट्रीय उद्यानाचं नाव हेली राष्ट्रीय उद्यान होतं. १९ एप्रिल १९५५ या दिवशी जिम कॉर्बेट यांचा मृत्यू झाला आणि १९५७ मध्ये या अभयारण्याला त्यांचं नाव देण्यात आलं. जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यान ५२०.८ चौरस किलोमीटर परिसरात पसरलं आहे. या उद्यानात डोंगराळ भाग आहे. नद्या आहेत. सपाट भूमी आहे. गवताळ जमीन आणि भला मोठा तलावही आहे. या अभयारण्यात प्राण्यांसोबतच ५८० प्रजातींचे पक्षीही बघायला मिळतात. इथे भरपूर झाडं आहेत. जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यानात ११० प्रजातींची झाडं बघायला मिळतात. ५० प्रजातींचे सस्तन प्राणी आणि २५ प्रजातींचे सरपटणारे प्राणीही इथे आहेत. जिम कॉर्बेट हे भारतातलं सर्वात जुनं राष्ट्रीय उद्यान आहे. १९३६ मध्ये या राष्ट्रीय उद्यानाचं प्रवेशद्वार उघडण्यात आलं. रॉयल बंगाल टायगर हा भारताचा राष्ट्रीय प्राणी. त्यांचं संवर्धन आणि संरक्षण हा या राष्ट्रीय उद्यानाचा महत्त्वाचा उद्देश आहे आणि हा उद्देश साध्य करण्यात जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यान यशस्वी ठरलं आहे.

जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यानाच्या ७३ टक्के भागात घनदाट जंगल आहे. या राष्ट्रीय उद्यानात रिव्हर राफ्टिंगचा आनंद लुटता येतो. इथलं एलिफंट सफारीही खूप प्रसिद्ध आहे. हत्तीवर बसून जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यानात फेरफटका मारणं हा अनोखा अनुभव ठरतो. जवळपास नऊ ते दहा फूट उंचीवरून आपण जिम कॉर्बेटचं सौंदर्य न्याहाळू शकतो. इथे जीप सफारीही आहे. पावसाळ्यात जिम कॉर्बेटमधल्या जीप सफारीचा आनंद लुटता येईल.

जीपमध्ये बसून प्राण्यांची छायाचित्रंही घेता येतात. या अभयारण्यात एक वस्तू संग्रहालयही आहे. जिम कॉर्बेटच्या कार्याबद्दल जाणून घ्यायचं असेल तर या वस्तूसंग्रहालयाला भेट द्यायला हवी. या वस्तू संग्रहालयात वाघांबद्दलही बरीच माहिती मिळते. म्हणूनच उत्तराखंडमधलं हे राष्ट्रीय उद्यान पर्यटक आणि प्राणीप्रेमींना नेहमीच भुलवतं.

## दमदार नगारा

वाद्यांची ओळख

नगारा हे एक पारंपरिक भारतीय तालवाद्य आहे. हे मोठ्या आकाराचे ड्रमसारखे वाद्य असते. नगाऱ्याचे शरीर तांब्या किंवा पितळेसारख्या धातूपासून बनवलेले असते. क्वचित प्रसंगी ते लाकडी किंवा मातीचे असू शकते. त्यावर प्राण्यांच्या कातड्याचे आवरण घट्ट बांधलेले असते. हे कातडे मोठ्या लोखंडी कड्यांनी किंवा दोऱ्यांनी बांधलेले असते ज्यामुळे आवाज घुमतो. जोरदार होतो.



नगारा साधारणपणे जोडीने वाजवला जातो. एक मोठा आणि एक थोडा लहान. दोन्ही नगाऱ्यांना मोठ्या लाकडी गजांनी किंवा वाकड्या काठ्यांनी ठोकून आवाज काढला जातो. त्याचा आवाज इतका दमदार असतो की तो लांबवर ऐकू येतो. पूर्वीच्या काळात राजा किंवा सरदार येत असल्याची घोषणा करण्यासाठी नगारा वाजवला जात असे. तसेच युद्ध सुरू होण्यापूर्वी सैनिकांना जोश देण्यासाठीही त्याचा वापर होत असे. म्हणून नगाऱ्याला शौर्य आणि उत्साहाचे प्रतीक मानले जाते.

आजही महाराष्ट्रात यात्रा, दहीहंडी, गुढीपाडवा, गणपती मिरवणूक अशा अनेक ठिकाणी नगाऱ्यांचा गजर ऐकायला मिळतो. ढोल-ताशांच्या बरोबर नगारा आणखी उर्जा निर्माण करतो. पंजाबमध्ये याला नगाडा किंवा नगाडे म्हणतात. मंदिरात खास प्रसंगी देवाला जागवण्यासाठीही नगारा वाजवला जातो. नगाऱ्याचा आवाज केवळ कानाला नाही तर थेट मनाला भिडतो. तो जमावाला एकत्र आणतो. आणि प्रत्येकाला उत्साहाने भारून टाकतो. त्यामुळे हे पारंपरिक वाद्य आजही आपल्या संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग आहे.

## पँडोराची पेटी

ग्रीक लोककथा

खूप खूप वर्षांपूर्वीची गोष्ट. तेव्हा जगात दुःख नव्हते. आजार नव्हते. भांडणे नव्हती. सारे जग सुखी होते.पण एकदा एका माणसाने देवांकडून आग पळवून आणली. देवांचा राजा झूआस खूप संतापला. त्याने मानवांना शिक्षा करायची ठरवले.



झूआसने मातीपासून पँडोरा नावाची एक सुंदर स्त्री तयार केली. पँडोरा म्हणजे देवांची देणगी. देवांनी तिला सगळे गुण तर दिलेच पण त्याबरोबर त्यांनी तिला थोडीशी उत्सुकता आणि अधीरपणाही दिला. पँडोरा माणसांबरोबर राहू लागली.

एक दिवस झूआस तिला भेटायला आला. त्याने तिला एक सोन्याची पेटी दिली. यात खूप महत्वाच्या वस्तू आहेत. मी परत येईपर्यंत ती सांभाळ. मात्र कधीही उघडू नकोस. पँडोराने ती बाजूला ठेवून दिली. पण तिचे लक्ष सारखे त्या पेटीकडे जाई. काय असेल याच्यात? तिच्या मनातली उत्सुकता वाढत राही.

अखेर एक दिवस तिने ती पेटी हातात घेतली. हळूच अगदी थोडे झाकण उघडून बघू. झूआसला कळणार पण नाही. तिने हळूच झाकण उचलले.

पुढच्याच क्षणी आतून खूप जोरात धक्का बसला आणि भयानक आवाज करत अनेक काळ्या सावल्या बाहेर उडाल्या. आजार, दुःख, भांडण, मत्सर, राग, भूक, लढाया यांच्या त्या सावल्या होत्या. पँडोरा घाबरली. तिने झाकण लावले. पण काय उपयोग? तोवर ते सारे जगभर पसरले होते. ती रडायला लागली. इतक्यात डब्यातून एक लहानसा प्रकाश बाहेर आला. ती होती आशा. आशेने पँडोराला धीर दिला. आशा म्हणाली, घाबरू नकोस. मी जगात राहीन आणि लोकांना दुःखातही पुढे जगायला मदत करीन. तेव्हापासून उद्याचा दिवस तरी छान असेल या आशेवर लोक आनंदाने जगू लागले.




## मनोहारी सिमला

सिमला ही हिमाचल प्रदेशची राजधानी. सिमला खूप सुंदर आहे. इथे पर्यटकांची वर्दळ असते. श्यामला देवीच्या नावावरून या शहराला सिमला हे नाव पडलं. हे शहर सात टेकड्यांवर वसलं आहे. म्हणूनच त्याला टेकड्यांची राणी असंही म्हटलं जातं. सिमल्यात उत्तर भारतातलं पहिलं पोस्ट ऑफिस सुरू झालं. इथल्या कॉनी कॉटेज नावाच्या छोट्याशा इमारतीत १८८२ मध्ये पोस्टच्या कामाला सुरूवात झाली.

आपण सिमला मिरची खातो. ब्रिटिशांनी सिमल्यात पहिल्यांदा या मिरचीची लागवड केली. म्हणून या मिरचीला सिमला मिरची असं



सफर शहरांची

म्हणतात. सिमल्यामध्ये बर्फ पडतो. इथे तुम्ही आईस स्केटिंगचा आनंद लुटू शकता. सिमल्यामध्ये १८८८ मध्ये टाउन हॉल बांधण्यात आला. दक्षिण-पूर्व आशियातल्या सर्वात मोठ्या माउंटन बायकिंग शर्यतीचं आयोजन सिमल्यात केलं जातं. या शर्यतीत बरेच स्पर्धक सहभागी होतात.

सिमल्यात बघण्यासारखं बरंच काही आहे. कालका-सिमला रेल्वेला युनेस्कोने जागतिक वारसा यादीत स्थान दिलं आहे. सिमला हे बऱ्याच प्रसिद्ध लोकांचं जन्मस्थानही आहे. इथे आल्यानंतर मॉल रोड, जाखू मंदिर, सिमला ख्राईस्ट चर्च ही ठिकाणं बघायला हवीत. असं हे सिमला अनेकांचं आवडतं पर्यटन स्थळ बनून गेलं आहे.

## असं मिळवा यश

कोण होणार?



दहावी-बारावीच्या परीक्षांना आपल्या आयुष्यात खूप महत्त्व आहे. या परीक्षेतल्या गुणांवरून आपण करिअरचा मार्ग ठरवतो. दहावीच्या निकालानंतर आपण विज्ञान, वाणिज्य किंवा कला यापैकी एका शाखेची निवड करतो. परीक्षा झाल्यावर आपला कल नेमका कोणत्या क्षेत्रात आहे याबाबत चर्चा केली जाते. मग आवडीनुसार विज्ञान, वाणिज्य किंवा कला शाखेची निवड केली जाते. पण त्यानंतरही अनेकांना कोणत्या क्षेत्रात करिअर करावं हे समजत नाही. बरीच मुलं गोंधळलेली असतात. म्हणूनच बारावीनंतर कोणत्या गोष्टींकडे लक्ष द्यायला हवं याविषयी...

- तुम्ही करीअरचा मार्ग निवडला असेल तर काही हरकत नाही. पण अजूनही काही ठरलं नसेल तर घरच्यांशी चर्चा करून आपला मार्ग निवडा. त्यानंतर त्या क्षेत्राशी संबंधित एखाद्या विषयात प्राविण्य मिळवा. आजच्या काळात पदवीसोबतच इतर कौशल्य असणं गरजेचं आहे.
- विषयाची निवड केल्यानंतर एक उद्दिष्ट ठरवा. वयाच्या २४ किंवा २५ वर्षांपर्यंत नोकरी मिळेल या दृष्टीने प्रयत्न सुरू करा. स्वत:चा व्यवसाय सुरू करायचा असेल तर त्या दृष्टीने प्रयत्न करा.
- आयुष्यात काय करायचं आहे याचा निर्णय तुमचा तुम्हीच घ्यायचा आहे हे लक्षात घ्या. मित्रमैत्रिणी काय करतात, त्यांनी कोणती शाखा निवडली आहे यावरून स्वत:चे निर्णय घेऊ नका. तुमचा कल कशात आहे हे ओळखा.
- व्यावसायिकतेचे धडे तुम्ही घ्यायला हवेत. दहावीपर्यंत तुम्ही शाळेत होतात. पण आता तुम्ही आयुष्यात यशस्वी होणार आहात. नोकरी किंवा व्यवसाय करताना तुम्हाला यशस्वी व्हायचं असेल तर या गोष्टी महत्त्वाच्या ठरतील.

## सांस्कृतिक नदी- सिंधु

ओळख नद्यांची

सिंधू नदी ही भारतातील आणि जगातील सर्वांत जुन्या संस्कृतीला जन्म देणारी नदी मानली जाते. तिचा उगम तिबेटमधील मानसरोवर जवळ होतो. तिथून ती जम्मू-काश्मीर, पाकिस्तान आणि शेवटी अरबी समुद्राला मिळते. तिची लांबी सुमारे ३१८० किलोमीटर आहे. सिंधू नदीला इंग्रजीत इंडस म्हणतात. भारताची इंडिया आणि हिंदुस्थानही नावे सिंधू नदीवरून पडल्याचे मानले जाते.

सिंधू नदीच्या काठावरच जुन्या काळात सिंधू संस्कृती फुलली. हडप्पा आणि मोहेंजोदडो ही दोन प्रसिद्ध प्राचीन शहरे या नदीजवळ सापडली आहेत. या संस्कृतीतील लोक शेती, लोखंडकाम, मातीची भांडी बनवणे आणि व्यापार यात तरबेज होते. त्यामुळे सिंधू नदीला जगातील प्राचीन संस्कृतीची जननी मानले जाते. ही नदी भारतात लडाख आणि जम्मू-काश्मीरमधून वाहते. तिथे तिचे पाणी स्वच्छ आणि निळसर दिसते. भारतीय सैन्याचे काही तळही या नदीच्या जवळ असल्याने तिचे महत्व अधिक आहे. सिंधू नदी पाकिस्तानसाठीदेखील अत्यंत महत्त्वाची आहे. त्या देशातील अनेक धरणे आणि कालवे या नदीवर आहेत. या पाण्याने गहू, कापूस आणि तांदूळ यांची शेती केली जाते. भारतातही जम्मू-काश्मीरमधील अनेक लहान गावांना सिंधू नदीचे पाणी उपयोगी पडते. सिंधू नदीला धार्मिक महत्त्वही आहे. हिंदू धर्मात या नदीला पवित्र मानले जाते. अनेक लोक तिची पूजा करतात. तिच्या पाण्याला पवित्र मानले जाते. अशा या सिंधू नदीने हजारो वर्षे लोकांचे जीवन समृद्ध केले आहे. सिंधू नदीने लोकांना अन्न, पाणी, संस्कृती आणि ओळख दिली आहे.



ठिपके जुळवा






## आगळेवेगळे छंद

धमाल

मुलांनो, परीक्षा संपल्यानंतर तुम्हाला भरपूर वेळ मिळतो. तुम्ही या मोकळ्या वेळेचा सदुपयोग करू शकता, नव्या गोष्टी शिकू शकता. मित्रमैत्रिणींनो, आपल्याला एखादा छंद असायला हवा. छंदांमुळे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. सुटीमध्ये फक्त मोबाईलवर खेळत बसण्यापेक्षा वेगळं काही तरी करा. एखादा छंद जोपासा. तुमच्यातल्या कलागुणांना वाव द्या. सुट्टी सुरू झाल्यावर नेमकं काय करता येईल? जाणून घेऊ.



- मुलांनो, तुम्ही स्वयंपाक शिकू शकता. आज प्रत्येकालाच थोडाफार स्वयंपाक यायला हवा. विविध पदार्थ बनवण्याची आवड असेल तर तुम्ही नवे पदार्थ बनवून बघू शकता. सोपे पदार्थ नक्की बनवून बघा. तुमच्या मित्रमैत्रिणींनाही सोबत घ्या. तुम्ही बनवलेला एखादा पदार्थ आईबाबांना खायला घाला.
- तुम्ही नाचाच्या क्लासला जाऊ शकता. नाचणं हा खूप चांगला व्यायाम आहे. नाचाच्या क्लासमध्ये तुम्हाला नवे मित्रमैत्रिणी भेटतील. खूप गप्पा मारता येतील आणि सोबतच नृत्यकलाही शिकता येईल.
- तुम्हाला चित्र काढायला आवडतं? मग चित्रकलेच्या क्लासला जा. चित्रकलेमुळे तुमच्या कल्पनाशक्तीला चालना मिळते. आपले विचार, भावना कागदावर उतरवण्याची क्षमता विकसित होते.
- छोट्यांनो, सुट्टीत तुम्ही वाचन करू शकता. वेगवेगळ्या विषयांवरची पुस्तकं वाचा. पुस्तक प्रदर्शनाला भेट द्या. पुस्तकं वाचल्यामुळे तुम्हाला भरपूर ज्ञान मिळतं. शिवाय वेळही छान जातो.
- धाडसी खेळांची आवड असेल तर तुम्ही हायकिंग करू शकता. हायकिंगमुळे तंदुरूस्ती वाढते. तसंच शरीराची क्षमताही सुधारते. तुम्ही नवी आव्हानं स्वीकारायला सज्ज होता.
- छोट्यांनो, सुट्टीत लेखनही करता येईल. तुम्ही आपल्या विचारांना शब्दरुप देऊ शकता. तुमच्या आवडीच्या विषयावर लिहा. तुमचं लिखाण वेबसाईटवर प्रकाशितही होऊ शकतं. त्यामुळे लिहिण्याचा प्रयत्न करून बघा.

दोस्त हे मस्त

### उंचपुरा जिराफ



जिराफ या पृथ्वीवरचा सर्वात उंच प्राणी आहे. जिराफाचे पाय माणसांच्या उंचीपेक्षाही लांब असतात. त्याच्या पायाची लांबी सहा फुटांपर्यंत असू शकते. जिराफाच्या अंगावर चट्टे असतात. गंमत म्हणजे प्रत्येक जिराफाच्या अंगावरचे चट्टे वेगळे असतात. जिराफ फार झोपत नाही. त्याला पाच मिनिटांची झोपही पुरते. जिराफ अर्ध्या तासापेक्षा जास्त वेळ झोपत नाही. तो उभ्या उभ्या झोपतो. पिलांना जन्म देतानाही जिराफ उभाच असतो. आयुष्यातला बराच काळ जिराफ उभाच असतो.

खादाडी

### मस्त पनीर मॅक्रोनी

मुलामुलींनो, तुम्ही मस्तपैकी पनीर मॅक्रोनी बनवू शकता. यासाठी ५० ग्रॅम मॅक्रोनी घ्या. दोन चमचे किसलेलं पनीर, एक कप दूध, सिमला मिरची, मीठ, मिरपूड आणि पाणी हे साहित्य घ्या. सर्वात आधी मॅक्रोनी उकडून घ्या. त्यानंतर कढई गॅसवर ठेवा. त्यात दूध घाला. उकळल्यावर सिमला मिरची, मीठ, मिरपूड, पाणी आणि पनीर घाला. दोन मिनिटं शिजू द्या. दूध आटल्यावर त्यात मॅक्रोनी घालून हलवून घ्या. तुमचं पनीर मॅक्रोनी तयार आहे.



स्टडी टिप्स

### गोंधळ दूर करा



मुलांनो, कोणताही विषय नीट समजून घेतल्याशिवाय तुम्हाला अभ्यास करता येणार नाही. शाळेत शिकवलेला विषय समजला नाही तर घाबरून जाऊ नका. शिक्षकांना विचारा. घरी आल्यावर आई-बाबांकडूनही विषय समजून घेता येईल. विषय नीट समजून घेतला तर तुमचा गोंधळ होणार नाही. शाळेतले शिक्षक विषय नीट समजावून सांगतील. तुम्ही शिकवणीला जात असाल तर तिथल्या शिक्षकांची मदत घेऊ शकता.

योगा टाईम

### वाढवा रोगप्रतिकारक शक्ती



छोट्यांनो, विविध आजारांपासून बचाव करण्यासाठी आपलं शरीर सक्षम असायला हवं. म्हणजेच आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढायला हवी. यासाठी तुम्ही नियमित योगासनं करू शकता. काही योगासनांमुळे प्रतिकारशक्ती वाढायला मदत होते आणि सर्दी, खोकला, ताप, फ्लूसारखे आजार होत नाहीत. ताडासन हे सुद्धा असंच एक आसन आहे. ताडासन केल्यामुळे संपूर्ण शरीराचा व्यायाम होतो. त्यामुळे नियमितपणे ताडासन करा.

